## कोकाटे वाचणार की जाणार?



**मुंबई :** मुंबई - नाशिक जुन्या आग्रा महामार्गावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त लावलेले बॅनर राजकीय चर्चेचा विषय ठरत आहेत. हे बॅनर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या गटाकडून लावण्यात आल्याची जोरदार चर्चा सुरू असून, उपमुख्यमंत्र्यांना खुश करण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

माणिकराव कोकाटे सध्या विविध वादग्रस्त प्रकरणांमुळे अडचणीत आहेत. सभागृहात मोबाईलवर ह्यरमीह्य गेम खेळणे, सरकारविषयी अवमानकारक वक्तव्य करणे आणि पक्षातील अंतर्गत कुरघोडीमुळे त्यांचं मंत्रीपद धोक्यात आले आहे. त्यामुळेच आज कोकाटे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात होणारी बैठक निर्णायक मानली जात आहे.

या बैठकीत कोकाटेंच्या भविष्यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा निर्णय त्यांच्या राजकीय भवितव्याचा फैसला करेल. राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच कोकाटेंच्या कामकाजावर नाराजी वाढत असल्याचेही समजते. दरम्यान, कोकाटेंनी अजित पवार यांच्याशी सलगी साधण्याचा आणि वाचण्याचा अंतिम प्रयत्न सुरू केला आहे. मात्र दगडगोट्याच्या डोक्यावर फूल ठेवून काहीच उपयोग नाही अशा प्रतिक्रिया पक्षातील काही नेते मांडत आहेत. शिंदे सरकारमधील वादग्रस्त मंत्र्यांना बाहेरचा रस्ता दाखवण्याचा दबाव अजित पवारांवर वाढत आहे. त्यामुळे कोकाटेंचं मंत्रीपद राखलं जाईल की त्यांची सुटका होईल, याकडे राज्याचे लक्ष लागून राहिलं आहे.

# भ्रष्ट मंत्र्यांना तात्काळ बडतर्फ करा!

**अंबादास दानवेंच्या नेतृत्वात उबाठा गटाची राज्यपालांकडे मागणी : घोटाळेबाज मंत्र्यांची यादी सादर**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८:** महाराष्ट्रातील मंत्रिमंडळ आता केवळ सत्तेचा नव्हे, तर भ्रष्टाचार, असंवेदनशीलता आणि गैरव्यवहारांचा अड्डा झाला आहे, असा घणाघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आज महामहीम राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे थेट केला.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली मोठं शिष्टमंडळ आज राज्यपालांची भेट घेऊन कलंकित, विवादग्रस्त आणि जनतेचा विश्वासघात केलेल्या मंत्र्यांची तात्काळ बडतर्फी करण्याची मागणी केली. या शिष्टमंडळाने एक सविस्तर पत्र राज्यपालांना सादर करत, मंत्रिमंडळातील गंभीर प्रकरणांची जंत्री मांडली.

या पत्रात मंत्री संजय शिरसाठ, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, राज्य मंत्री योगेश कदम आणि नितेश राणे यांचे गंभीर आरोप, वादग्रस्त कृती आणि जनतेत निर्माण झालेली अस्वस्थता अधोरेखित करण्यात आली.

तसेच, हनी ट्रॅप प्रकरण, ठाणे-बोरीवली बोगदा गैरव्यवहार, मीरा-भाईंदर महापालिकेतील भू-संपादनातील भ्रष्टाचार, शासकीय यंत्रणांवर राजकीय हस्तक्षेप आणि अंमलात न आणलेली पोलीस चौकशी याबाबत राज्यपालांना स्पष्ट माहिती दिली गेली.




या निवेदनाद्वारे, ठाकरे गटाने भाजप-शिंदे सरकारच्या मंत्रीमंडळातील नैतिक अधःपतनाचा पदार्फाश केला आहे. ह्यही केवळ सरकारची लाजिरवाणी अवस्था नसून, राज्याच्या लोकशाही व्यवस्थेची देखील थट्टा आहे, असं अंबादास दानवे यांनी राज्यपालांसमोर ठणकावून सांगितलं.

या प्रतिनिधी मंडळात अनिल परब, विनोद घोसाळकर, बबनराव थोरात, सुषमा अंधारे, नितीन देशमुख, मिलिंद नार्वेकर, साईनाथ दुर्गे, पराग डाके, अशोक धात्रक, महेश सावंत, मनोज जामसुतकर यांसारखे अनेक नेते आणि आमदार सहभागी झाले होते.

सत्ताधारी मंत्र्यांच्या वादग्रस्त कृत्यांवर राज्यपालांनी आता गप्प बसू नये, अशी ठाम भूमिका शिवसेना (उद्धव गट) ने मांडली आहे. हे सरकार आता मंत्रीमंडळ नसून गैरव्यवहार मंडळ झाले आहे, असा घणाघातही यावेळी करण्यात आला.

राज्यपालांनी त्वरित कारवाई करावी, अन्यथा रस्त्यावर उतरून लढा देण्याचा इशारा ठाकरे गटाने दिला आहे. राजकारणात या मागणीने खळबळ उडवून दिली आहे. दरम्यान, राज्यपालांच्या भेटीवेळी काँग्रेस आणि शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे आमदार मात्र सहभागी झाले नव्हते.

## रोहित पवार २०१९ मध्येच भाजपात येणार होते

### नीतेश राणेंचा दावा



**मुंबई :** भाजपचे नेते आणि मंत्री नीतेश राणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्याबाबत मोठा दावा केला आहे. रोहित पवार हे २०१९ मध्येच भाजपात येणार होते, असा दावा नीतेश राणे यांनी केला आहे. इतकेच नाही, तर रोहित पवार हे मनाने भाजपचे आहेत. ते फक्त शरीराने शरद पवारांसोबत असल्याचेही नीतेश राणे म्हणाले. नीतेश राणे यांच्या दाव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

याआधी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनीही रोहित पवार भाजपात येऊ शकतात, असा सूचक इशारा दिला होता. सुनील तटकरे यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना, नीतेश राणे यांनी उपरोक्त दावा केला. त्यांची ही प्रतिक्रिया पाहता, हे विधान केवळ राजकीय डावपेच नव्हता, तर त्यामागे काही ठोस हालचाली असाव्यात, अशी चर्चा रंगू लागली आहे.

ते कुठल्या कुठल्या भाजप नेत्यांना कधी भेटतात, हे जर आम्ही सांगायला लागलो तर त्यांना तोंड वाचवायलाही जागा राहणार नाही. याच वक्तव्यात राणे यांनी आणखी एक विधान करत म्हटले की, ते मनाने भाजपचे आहेत, फक्त शरीराने शरद पवार साहेबांबरोबर आहेत.

## खेवलकर विरोधात कट

### हॅकर मनीष बंगाळे यांचा दावा

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचे जावई आणि प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर हे पुण्यातील खराडी परिसरात रेव्ह पार्टीमध्ये आढळून आले होते. त्यानुसार पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी आता प्रांजल खेवलकर यांचे वकील विजयसिंह ठोंबरे आणि एथिकल हॅकर मनीष बंगाळे यांनी खळबळजनक दावे केले आहेत. खेवलकर यांच्यावर पूर्वनियोजित पद्धतीने अडकवण्याचा दोन वेळा प्रयत्न केले गेले होते. हा संपूर्ण प्रकार बनावटी असल्याचा दावा ठोंबरे यांनी केला आहे.

मनीष बंगाळे म्हणाले, प्रांजल खेवलकर यांचा रेव्ह पाटीर्शी काहीही संबंध नाही. त्यांना कॉल करून त्या ठिकाणी बोलवण्यात आले होते. त्यानंतर या घटनास्थळी छापेमारी करण्यात आली, या प्रकरणाच्या तांत्रिक बाबी समोर आल्या आहेत. त्यांची माहिती मी गोळा केली आहे. त्यानुसार या प्रकरणात खेवलकर यांना स्पष्टपणे अडकवण्यात आले आहे. या प्रकरणाशी त्यांचा कसलाही संबंध नव्हता. त्यांना तिथे बोलावण्यात आले होते आणि ते जाळ्यात अडकले, असा दावा देखील त्यांनी केला आहे. या प्रकरणी रेव्ह पार्टीशी खेवलकर यांचा कोणताही संबंध नाही. पार्टीतील लोकांनाही ते ओळखत नाहीत. यापूर्वी पार्टीतील लोकांच्या संपर्कात देखील ते नव्हते. पुणे पोलिसांना मी या सर्व गोष्टी सांगणार आहे. खेवलकर यांचे कॉल रेकॉर्ड्स आणि इतर गोष्टी तपासल्या तर त्यांच्या विरोधात कट रचला गेला, हे स्पष्ट होईल, असा दावा बंगाळे यांनी केला आहे.

### सांभाळण्याचा कंटाळा म्हणून तीन मुलींना

# आईनेच दिले विष

### पतीने व्यक्त केला होता पत्नीवर संशय

■ **वृत्तसंस्था, ठाणे, दि. २८:** अस्नोली येथील विषबाधेने मृत्यू झालेल्या तीन मुलींना जन्मदात्री आईनेच अन्नामध्ये तणनाशक रसायन टाकून त्यांची हत्या केल्याचे स्पष्ट झाले.

संध्या भेरे असे महिलेचे नाव असून मुलींना अन्नातून विषबाधा झाल्याचा बनाव तिने रचला होता. तीनही मुलींना सांभाळण्याचा आलेला कंटाळा, त्यांच्या खर्चाचा असह्य ताण यामुळे संध्या हिने तिघींची हत्या केल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी संध्या भेरे हिला पोलिसांनी अटक केली आहे.

संदीप भेरे यांची पत्नी संध्या ही तीन मुलींसह गेल्या आठ महिन्यांपासून शहापूर तालुक्यातील अस्नोली येथे तिच्या माहेरी राहत होती. सोमवार, २१ जुलै या दिवशी काव्या (१०), दिव्या (८) व गार्गी (५) या तिघींच्या जेवणात त्यांची आई संध्या हिने तणनाशक रसायन टाकले होते.

या घटनेत फक्त मुलींनाच त्रास झाल्याने मुलींचे वडील संदीप भेरे यांनी मुलींच्या आई संध्या हिच्यावर संशय व्यक्त केला. किन्हवली पोलिसांनी मुलींची आई संध्या हिला चौकशीसाठी ताब्यात घेतले होते.

यामध्ये जन्माला आलेल्या तीनही मुलीच, त्यांना सांभाळण्याचा कंटाळा व त्यांच्या खर्चाचा असह्य ताण यामुळे जीवन त्रस्त झाल्याने मुलींच्या जेवणात तणनाशक रसायन मिसळून त्यांना खायला घातल्याचे तपासात निष्पन्न झाले. संध्या भेरे हिला अटक केल्याचे पोलिस उपअधीक्षक मिलिंद शिंदे यांनी सांगितले.

सुरूवातीला आरोपी महिलेने नानुकूर करीत या घटनेशी संबंध नसल्याचे सांगितले होते . मात्र, असंगत बयानामुळे अखेर ती अडकली.

# शासकीय महा-राईड ॲप लवकरच

### मंत्री सरनाईक यांची माहिती : मराठी तरुणांना रोजगाराची मोठी संधी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८:** राज्य सरकारकडून ॲप आधारित प्रवासी वाहन सेवेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात येत असून, खासगी कंपन्यांच्या मक्तेदारीला पर्याय देणारे शासकीय ॲप लवकरच कार्यान्वित होणार आहे. मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी हे ॲप सुरू करण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात आहे. या ॲपसाठी जय महाराष्ट्र, महा-राईड, महा-यात्री, महा-गो अशी नावे प्रस्तावित असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या मान्यतेनंतर ते लाँच होणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

सरनाईक म्हणाले की, प्रवासी वाहतुकीतील पारदर्शकता आणि विश्वासार्हतेसाठी हे शासकीय ॲप उपयुक्त ठरेल. महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्ट टेक्नॉलॉजी आणि मित्र या संस्थांच्या सहकार्याने ॲप तयार करण्याचे काम सुरू असून, खासगी कंपन्यांसोबत देखील तांत्रिक चर्चा चालू आहे. केंद्र सरकारच्या ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्वांनुसार नियमावली अंतिम टप्प्यात आहे.

या उपक्रमाअंतर्गत मराठी तरुणांना वाहन खरेदीसाठी अर्थसहाय्यही मिळणार आहे. मुंबै बँकेच्या माध्यमातून १० टक्के व्याजदराने कर्ज देण्यात येणार असून, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ, भटके विमुक्त महामंडळ, ओबीसी महामंडळ आणि एमएसडीसी या संस्थांकडून ११ टक्के व्याज परतावा अनुदान दिले जाणार आहे.

त्यामुळे कर्ज बिनव्याजी असल्यासारखे ठरणार आहे, असे मुंबै बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी स्पष्ट केले.



ही योजना महाराष्ट्रातील लाखो तरुण-तरुणींना आत्मनिर्भर बनविणारी ठरेल. खासगी कंपन्यांच्या मक्तेदारीला पर्याय देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे.
**प्रताप सरनाईक**
**परिवहन मंत्री.**

सरनाईक यांनी यावेळी खासगी ॲप कंपन्यांवर टीका करताना सांगितले की, सध्या अनेक कंपन्या चालक आणि प्रवाशांची लूट करत आहेत. शासनाकडे आवश्यक तंत्रज्ञान, मनुष्यबळ आणि यंत्रणा उपलब्ध असल्याने शासकीय ॲप अधिक विश्वासार्ह ठरेल.

या ॲपच्या अंतिम रूपासाठी ५ ऑगस्ट रोजी मंत्रालयात विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर, तंत्रज्ञ आणि शासकीय अधिकारी सहभागी होणार असून, या वेळी ॲपला अंतिम मंजुरी दिली जाईल, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

## वैद्यकीय अहवाल द्या



■ **वृत्तसंस्था पुणे, दि. २८:** एकनाथ खडसे यांचे जावई डॉ. खेवलकर यांच्या वैद्यकीय अहवालावरून आता राजकीय आरोप होताना दिसत आहेत.

खेवलकर यांचा वैद्यकीय अहवाल देण्यास पोलिसांनी रोहिणी खडसे यांना नकार दिला होता. त्यानंतर तो अहवाल प्राप्त झाला असल्याचा दावा प्रसार माध्यमांनी केला आहे. यावरून रोहिणी खडसे यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधीकडे आपल्याला अहवाल देण्याची विनंती केली आहे. तर दुसरीकडे एकनाथ खडसे यांनी मद्य सेवनाचा अहवाल आला, तर अमली पदार्थ सेवनाचा अहवाल का आला नाही? यावरून प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

या संदर्भात एकनाथ खडसे यांनी एका पोस्टच्या माध्यमातूनही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आपल्या पोस्टमध्ये ते म्हणाले की, 'डॉ. खेवलकर यांचा वैद्यकीय अहवाल आला असल्याचे काही वृत्तवाहिनींच्या माध्यमातून कळले. इथे एक साधा प्रश्न पडत आहे की मद्य सेवनाच्या चाचणीचा अहवाल इतक्या तात्पर्यतेने येतो, तो माध्यमांमध्ये प्रसिद्ध होतो मग अंमली पदार्थांच्या चाचणीचा अहवाल येण्यास इतका वेळ का लागत आहे?

### शनी शिंगणापूर संस्थानचे माजी विश्वस्त

## नितीन शेटे यांची आत्महत्या

■ **वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. २८:** शनी शिंगणापूर संस्थानचे माजी विश्वस्त नितीन शेटे यांनी त्यांच्या निवासस्थानी शनी शिंगणापूर परिसरात आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.



मागिल काही दिवसांपासून शनी शिंगणापूर संस्थान विविध मुद्यांमुळे चर्चेत आहेत. महिनाभरापूर्वी ११४ मुस्लिम कर्मचारी घेतल्यामुळे संस्थानच्या विश्वस्त मंडळावर आरोप करण्यात आले होते. त्यानंतर या कर्मचाऱ्यांना काढण्यात आले होते. त्यानंतर देवस्थानचे बनावट ॲप्स तयार करून पैशांची अफरातफर केल्याचा आरोप देखील झाला होता. या प्रकरणात सध्या चौकशी सुरु होती.

वास्तविक नितीन शेटे यांनी आत्महत्या का केली? या बाबत अद्याप खुलासा झालेला नाही. मात्र, विश्वस्त मंडळाने केलेल्या अनियमिततेबाबत एफआयआर दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरु असतानाच शेटे यांनी आत्महत्या केल्याने या अपहाराशी याचा संबंध आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जातोय.

नितीन शेटे हे आमदार शंकरराव गडाख यांचे खंदे समर्थक म्हणून ओळखले जात होते. ते संस्थानमध्ये उपकार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहत होते.

मात्र, अनियमितता समोर आल्यानंतर हे विश्वस्त मंडळ बरखास्त केले होते. त्यानंतर आता शेटे त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही तरी देखील यासंदर्भात शनी शिंगणापूर आणि परिसरात अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत. पोलिसांनी अद्याप या घटनेबद्दल कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. त्यामुळे चौकशीत काय समोर येणार? हे पहावे लागेल.

शनी शिंगणापूर देवस्थानाचे बनावट ॲप्स तयार करून पैशांची अफरातफर केल्याप्रकरणी सायबर खात्याच्या पोलिस उपमहानिरीक्षकांच्या देखरेखीखाली चौकशी आणि कारवाई करण्यात येत आहे.

# आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन



आजचा दिवस म्हणजे २९ जुलै हा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो.

जागतिक स्तरावर वाघांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे म्हणून सेंट पिटरर्सबर्ग येथे झालेल्या व्याघ्र परिषदेत २९ जुलै हा दिवस जागतिक व्याघ्र दिन म्हणून घोषित करण्यात यावा असा ठराव मांडण्यात आला त्याला सर्व देशांनी अनुमोदन दिल्याने हा दिवस जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो.

वाघ हा जंगलाचा राजा आहे. जंगलातील त्याची निर्धास्त चाल गगनभेदी डरकाळी या त्याच्या गुण वैशिष्ट्यामुळे वाघ हा सर्वांना आकर्षित करणारा प्राणी आहे. जगभरात कोणत्याही अभयारण्यात, जंगलातील सफरीवर गेलेल्या पर्यटकांचे पहिले आकर्षण वाघ दिसण्याचे असते. भारतीय संस्कृतीत तर वाघाला आदरयुक्त भीतीचे स्थान आहे. वाघाला जंगलाचा राजा असे संबोधले जाते.

वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी असून जनमानसात शौर्य, राजबिंडेपणा, सौंदर्याचे, राकटतेचे प्रतीक आहे म्हणूनच हिंदू संस्कृतीत वाघ पार्वतीचा अवतार असलेली देवी महिषासुरमर्दिनीचे व तिच्या अनेक रूपांचे वाहन बनले आहे. वाघ आणि आदिवासी जमातींचा हजारो वर्षाचा संबंध आहे.

आदिवासी जमातीत वाघाला देव मानतात. वाघांचा कोप होऊ नये म्हणून ते वाघाला देव मानून त्याची पूजा करतात. वाघांच्या अनेक जाती आहेत. भारतातील पट्टेरी वाघ जगातील वैशिष्ट्यपूर्ण प्राण्यांपैकी एक मानला जातो. भारत हे वाघांचे माहेरघर मानले जाते. भारताप्रमाणेच आशिया व आफ्रिका खंडातील इतर देशातही वाघांचे अस्तित्व आढळते. पूर्वी वाघांची संख्या खूप होती परंतु मधल्या काळात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली.

केवळ भारतातच नाही तर जगभरात वाघांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. खेळ, मनोरंजन आणि वाढत्या लोकसंख्येमुळे वाघांच्या आधीवासावर होणारे मानवी अतिक्रमण तसेच वाघांच्या अवयवांची तस्करी करण्यासाठी केली जाणारी शिकार यामुळे दिवसेंदिवस वाघांचे प्रमाण कमी होऊ लागले.

वाघांचे प्रमाण इतके कमी झाले की एकेदिवशी वाघांची डरकाळी लुप्त होईल की काय अशी भीती निर्माण झाली. ही भीती अनाठायी नाही. कारण गेल्या काही वर्षात वाघांच्या शिकारीच्या अनेक घटना आपल्या देशात घडल्या आहेत. चार वर्षांपूर्वी झालेल्या अवनी वाघिणीची शिकार कोण विसरेल?

अवनी वाघिणीची शिकार झाल्यावर संपूर्ण देश हळहळला होता. अवनी प्रमाणेच गोव्यातही दोन वाघिणींची शिकार करण्यात आली होती. मागील चार वर्षात अनेक वाघांचे मृतदेह वनविभागाला आढळून आले आहेत. वाघ कमी होणे ही धोकादायक बाब आहे कारण जंगलात वाघ असणे हे समृद्ध जंगलाचे लक्षण समजले जाते. जंगलात असलेल्या अन्न साखळीत वाघ हा प्रमुख घटक समजला जातो.

वाघांमुळे जंगलातील तृणभक्षी प्राणी व वनस्पती यांच्यात समतोल राखला जातो. वाघ नसतील तर जंगलात तृणभक्षी प्राण्यांची संख्या अमर्याद वाढेल व इतर निसर्गसंपदेवर या गोष्टीचा ताण पडेल परिणामी निसर्गचक्रच बिघडून जाईल. वाघ जंगलात असणे हे जंगलाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. वाघ असलेल्या जंगलात साधे लाकडूतोड करणारे व जंगलावर अवलंबून असणारव लोक भीतीपोटी जंगलात जात नाही त्यामुळे जंगलेही सुरक्षित राहतात.

वाघ नाहीसे झाले की जंगलही नाहीसे होतील आणि जंगले नाहीसे झाल्यास निसर्गचक्रच बिघडून जाईल आणि त्याचे दुष्परिणाम केवळ मानवजातीलाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीला भोगावे लागतील. तसे होऊ द्यायचे नसेल तर वाघांचे अस्तित्व टिकवले पाहिजे. आज या आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने वाघांचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घ्यायला हवी. ■ ■



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

# विश्व मानवतेचा आवाज म्हणजे अब्दुल कलाम

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २८:** विजय चव्हाण लिखित 'डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची स्मृतिफुले' या ग्रंथाचे प्रकाशन शुक्रवार पेठेतील जिजामाता हायस्कूल येथे संपन्न झाले. या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस यांनी अब्दुल कलाम यांच्याविषयी भावना व्यक्त केल्या.

सबनीस म्हणाले, महापुरुष कधीही देशधमार्शी सीमित नसतात. त्यांना जात-धमार्चे बंधन नसते. ते सर्व लोकांचे, सर्व देशांचे महापुरुष असतात. डॉ. अब्दुल कलाम हे नेहमीच 'विश्वधर्म' मानणारे होते. भारतीय आणि विश्वात्मक अशा सर्व प्रवाहांचे प्रतिबिंब त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येते.

कार्यक्रमाला नासा स्पेस एज्युकेटर लीना बोकिल, पिंपरी चिंचवड मसापचे अध्यक्ष राजन लाखे, अभियंता कमलकांत वडेलकर, लेखक विजय चव्हाण, प्रकाशक नितिन हिरवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन

राजन लाखे यांनी आपल्या भाषणात सांगितले, एखादी व्यक्ती जेव्हा ध्येय डोळ्यासमोर ठेवून पुढे जात असते तेव्हा ती ध्येयाने झपाटलेली असते. अब्दुल कलाम म्हणतात स्वप्न ते नाहीत जी आपण झोपेत पाहतो. स्वप्न ती आहेत जी आपल्याला झोपू देत नाहीत. असे ध्येयवेडे होण्यासाठी जिद्द, मेहनत आणि चिकाटी महत्वाची असते.

लीना बोकिल यांनी सांगितले, अनेक मोठ्या व्यक्तींमध्ये मला एक समान गोष्ट जाणवते ती म्हणजे विनम्रता. तुम्ही कितीही मोठे झालात तरी तुमच्यात विनम्रभाव नेहमी जपला गेला पाहिजे. विद्यार्थिदशेपासूनच तुम्ही स्वप्न बघायला सुरुवात केली पाहिजे. स्वप्न पाहिली तरच त्याच्या पूर्णत्वाचा ध्यास लागतो. कार्यक्रमात वीर शिवराय मंडळाचे किरण सोनिवाल, निलेश वरघन्टे, मनीषा पाटील, मनीषा चव्हाण, भाग्यश्री गायके, संगीता खताळ उपस्थित होते.





# श्री राजराजेश्वर मंदिरामध्ये पहिल्या सोमवारी कावडधारी शिवभक्तांनी केला जलाभिषेक

- प्राचीन श्रीराजेश्वर मंदिरात दर्शनासाठी रांगा
- भाविकांच्या सुरक्षेसाठी तगडा बंदोबस्त
- जुने शहरात 'हर हर महादेव' चा जयघोष

▪अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :

श्रावणातील पहिल्याच सोमवारी अकोला शहराच्या आराध्य दैवत श्रीराजेश्वराला जलाभिषेक करण्यासाठी असंख्य कावडधारी शिवभक्तांनी मोठ मोठ्या कावळांनी पूर्णा नदीचे पवित्रजल आणले पहाटेपासूनच कावळांची सुरुवात झाली होती हर बोला महादेव व ओम नमः शिवाय चा जयघोष करत शंकराचे गाणे म्हणत भक्तीभावात श्रीराजेश्वराला शिवभक्तांनी जलाभिषेक केला रिमझिम बरसणाऱ्या पावसाच्या सरी,,, अल्हाददायक वातावरण शिवभक्तांचा ओसंडून वाहणारा उत्साह,,, हर बोला महादेवाचा जयघोष,,, सोबतीला निघालेल्या शेकडो पालख्या व कावड आदींनी पहिला श्रावण सोमवार दणक्यात साजरा झाला, यंदा पहिल्या श्रावण सोमवारी एवढ्या पालख्या पाहावयास मिळाल्या पहिल्या सोमवारी एवढ्या मोठ्या संख्येने पालख्या निघाल्याने शेवटच्या सोमवारी शहरातील पालखी महोत्सव किती मोठ्या प्रमाणात साजरा केला जाईल याचा अंदाज लागू शकतो, पहिलाच श्रावण सोमवार असल्याने असल्याने शहराचे आराध्य दैवत श्रीराज राजेश्वर महाराजांच्या मंदिराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते भल्या पहाटेपासूनच श्रीराज राजेश्वराला जलाभिषेक





करण्यासाठी भाविकांची विशेषता महिलांची मोठ्या संख्येने गर्दी पहावयास मिळाली रात्री दोन नंतरच अनेक कावडधारींनी लहान मोठ्या कावडीने पवित्र पूर्णेचे पाणी आणून श्रीराज राजेश्वराला जलाभिषेक केला राजेश्वराचे दर्शन घेण्यासाठी मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली होती मंदिरा बाहेर हार फुले बिल्वपत्र प्रसाद खेळणी संसारपयोगी साहित्य आदींची मोठी दुकाने लागली होती भाविकांनी श्रींचे दर्शन घेतल्यानंतर खरीदारीचा आनंद घेतला गर्दीचा फायदा घेण्यासाठी टपलेल्या समाजकंटकांवर अंकुश लावण्यासाठी तसेच कुठलाही अनुचित प्रकार टाळण्यासाठी मंदिर परिसरात तसेच पालखी मार्गावर जागोजागी तगडा पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता मंदिर परिसरात सुद्धा सीसीटीव्हीच्या मदतीने परिस्थितीवर पोलीस लक्ष ठेवून होते.

## कर्ता हनुमान मंदिर येथील शिव मंदिरा पाच जोडप्यांच्या हातून रुद्धा अभिषेक



**अकोला** : आज पहिला श्रावण सोमवार निमित्ताने कर्ता हनुमान मंदिर येथील शिव मंदिरा मध्ये ५ जोडप्याच्या हातून रुद्धा अभिषेक करून महाआरती करण्यात आली ही परंपरा गेल्या १७ वर्ष्या पासून शिव मंदिरा, विठ्ठल मंदिर, बजरंग बली मंदिर मध्ये अखंड आरती सेवा देणारे ह भ प संजय वेध, ह भ प अंधारे, ह भ प सुकदेव वाडकर महाराज यांची सकाळी पाच ला अखंड सेवा असते आज दिनांक सोमवारी दिवस भर भाविकाची गर्दी असते २८/७/२५ अभिषेक हा ह भ प पंजाब वाघ महाराज यांनी करून घेतला कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष माजी सैनिक सुभाषराव म्हैसने, सेवाधिकारी विठ्ठल चिकटे, सेवाधिकारी संतोष जाधव, संजय वेध, माजी सैनिक लक्ष्मण मोरे, सौ मंगला म्हैसने, सौ निलीमा धरमकर, सौ देशमुखताई, सौ मगर ताई,सौ संगीता म्हैसने, शर्मा बाई,गजानन धरमकर, भिका भगत, सेलसींग सिसोदिया, सांगूनवेडे साहेब, पोपट साहेब, आणि कर्ता हनुमान मंडळाचे सर्व भाविक हजर होते.

## श्रावण सोमवार निमित्ताने सनातन संस्थेच्या वतीने शिवविषयक ग्रंथ प्रदर्शन !



**अकोला:** शिवभक्त श्रावण मासातील प्रत्येक सोमवारी शिवाची श्रद्धापूर्वक उपासना करतात. शास्त्र समजून शिवोपासना केल्यास उपासकाची भावभक्ती अधिकच वृद्धींगत होते, आणि त्याचा अधिकाधिक लाभ उपासकाला होतो. शिवोपासनेत प्रत्यक्ष मंदिरात दर्शन घेण्यापासून ते शिवपूजा करण्यापर्यंत अनेक कृतीचा समावेश होतो. शिवभक्तांना श्रावण सोमवारचा अध्यात्मिक स्तरावर पुरेपूर लाभ व्हावा, यासाठी सनातन संस्थेच्या वतीने २८ जुलै तसेच ४,११,१८ ऑगस्ट या दिवशी अकोला येथे शिवविषयक ग्रंथ प्रदर्शन कक्ष लावण्यात येणार आहे.

## कावड यात्रेने हिवरखेड दुमदुमले भर पावसात शिवभक्ताचा जल्लोष

**हिवरखेड,दि २८ (प्रतिनिधी) :** सालाबादप्रमाने श्रावन मासातील पहीला सोमवार कावड यात्रा ऊत्सव मोठ्या ऊत्सवात डी जे च्या तालावर वरुन राज्याच्या बरसत्या धारेत निघाल्या तर प्रथम सुरवातीला माजी आमदार स्व डॉ का.शा तिडके प्रवेशद्वारावर तिन्ही कावड यात्रेचे पुजन रमेश दुंतोडे सौ सूलभा दुंतोडे व कीरण सेदानी गणेश वानखडे सदींप ईगळे रवी वाकोडे सूरेशजी ओकारे याचे ऊपस्थीतीत करण्यात आले

सकाळी दहाला महाकालेश्वर कावड पालखी हजारो युवकासह पाचशे ऐक भरन्याची सर्वात मोठी कावडयात्रा म्हनुन पुढे तर दुर्सया क्रमाकांची बारगण पुरा श्रिराम सेनेची भव्य रामाची मूर्ती पिंड मानवी हनुमानासह तिनशे एक भरन्याची कावड श्रीराम भक्ता कडुन डी जे कम वाद्यासह हजारो भक्तासह निघाली तर तिसरी कावड यात्रा फत्तेपुरी शिवभक्त कावड मडंळाची एकशे ऐक भरण्याची वरील मान्यवराकडुन वाजत गाजत शिव भक्ताचे जल्लोशात नाचत गाजत निघाली मिरवनूक मार्गावर बंजरग दल मळी, बारगणपुरा चडिंका चौक येथे मराठा खाटीक समाज यूवा स्वाभीमान संघटना वंचीत बहुजन समाज पार्टी मनसे कडुन शिंदे सेना भाजयूमो तसेच महाकालेश्वर मित्र मडळाकडून फराळाची ऊसळ चहा फराळी चिवडा याचे वितरण सर्वासाठी ठेवण्यात आले चंडीका चौकात वरुन राजाचे आगमनाने भर पावसात शिवभक्तात नाचन्याचा ऊत्साह वाढला होता बाजाराचा दिवस असल्यावर पचक्रोशीतील लोकानी या यात्रेचा मनमूराद आंनद लूटला स्व देशभक्त सपतराव भोपळे प्रवेश दारापर्यत कावड यात्रेतील भक्ताना चहा दुध फराळाचे वाटप वीवीध संघटने कढुन होत होते तर सदाशिव सस्थानवर मदीॅर निर्मान समितीतर्फे कावड मडंळाचे प्रतीनीधीचा शाल श्रिफळ पुष्पसूमनानी सालाबादप्रमाने सत्कार करन्यात आला कावड यात्रेसाठी ठानेदार गजाननजी राठोड यांचे अधीपत्याखाली गोपाल गीलबीले दुय्यम ठानेदार गावंडे आर सी पी कमांडो सह पोलीस पाटिल प्रकाश गावंडे, रमेशभाऊ दुंतोडे





जमिरभाई पठान,शामशील भोपळे, किरण सेदाणी, संदीप ईगंळे महेद्र भोपळे राजू खॉन,पत्रकार बाळासाहेब नेरकर, शेख जमिर, मोईज जमादार सूरज चौबे! ऊमेश टापरे प्रकाश खोब्रागडे,शांताराम कवळकार, सतीष ईगळे,वीनोद भोपळे, हिफाजत खॉन ईत्यादी सह श्रीराम जाधव प्रफुल पवार धिरज साबळे गोपाल गीलबीले बीट जमदार विजय सोळंके साहेब अमोल बुंदे आकाश गजभार पंकज माळी क्राईमचे पाटील, गृहरक्षक दलाचे जवान मिरवनूकीत हजर होते तर बातमी लिहे पर्यत कावड मिरवनूक चालूच आहे

## थोडक्यात

### प्रभातच्या सहा बुद्धिबळ पटूंची राज्यस्तरावर निवड



अकोला : बुद्धिबळ खेळातून विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढत असून त्यांचा बौद्धिक विकास साधण्यासाठी मदत होते. विद्यार्थ्यांच्या कुशाग्रतेला चालना मिळावी या हेतुने महानगर बुद्धिबळ संघटना व प्रभात किड्स स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभातमध्ये आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन पोलिस अधीक्षक अर्चीत चांडक यांच्या शुभहस्ते करण्यात आले. जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये प्रभातच्या सहा विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर निवड झाली. आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन दि. १९ व २० जुलै रोजी करण्यात आले होते. १५ वर्षवयोगटामधील मुलींमधून तनिषा भिसे हिने द्वितीय तर आराध्या ढोले हिचे चवथा क्रमांक मिळिवला. तसेच मुलांमधून अर्णव गोलोकार ह्याने चवथा क्रमांक प्राप्त केला. तर १९ वर्षवयोगटामधून मुलींमध्ये यागनी परिका हिने तिसरा तर मुलांमधून अर्णव गोलोकार ह्याने प्रथम क्रमांक मिळवून यश संपादीत केले. तर खुल्या गटातून वरुण मुंदडा ह्याने द्वितीय क्रमांक पटकाविला तर अर्णव गोलोकार ह्याने तिसरा क्रमांक व विक्रमादित्य पराडकर ह्याने चवथा क्रमांक मिळविला.

## अल्पवयीन मुलीस फुस लावुन पळवुन नेणाऱ्या पखवाद वाजवणाऱ्या आरोपीस पुणे येथून अटक

▪**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :**

दिनांक १९/०७/२०२५ रोजी पो. स्टे. तेल्हारा येथील दाखल अपराध क्र. २१३ / २०२५ कलम १३७ (२) भा. न्या. सं. मधील अपहृत मुलीला गावाकातील युवकाने फुस लावुन पळुन नेली असावी अशा शक्यतेने तपास केला असता काही मिळुन येत नव्हते. तेव्हा अत्यंत हालाखीच्या परिस्थीतीत असलेल्या पिडीतीच्या आई वडीलांनी परिसरातील प्रतिष्ठीत नागरिक मार्फत मा. पोलीस अधीक्षक सा. श्री अर्चित चांडक सा. यांना मुलीचा शोध घेण्याची विनंती केली असता मा. पोलीस अधीक्षक सा. यांनी एल. सी. बी. चे प्रमुख श्री. शंकर शेळके यांना पथक नेमुन समांतर तपास करून मुलीचा



शोध घेण्याबाबत आदेशित केले.

त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा, अकोलाचे पथकाने पिडीत मुलीचे नातेवाईक, गावातील लोक यांना विचारपुस केली असता असे लक्षात आले कि, ०४ महिन्यापुर्वी गावातील वारकरी सप्ताह निमित्त आरोपी नामे प्रदिप दामोदार लासुरकार वय २५ वर्ष रा. तळेगाव वडनेर, ता. तेल्हारा जि. अकोला हा सप्ताहमध्ये किर्तन व पखवाज वाजविण्यासाठी आला होता, तेव्हा त्याची अपहृत मुलीसोबत ओळख झाली होती.गोपनिय माहिती व तांत्रीक माहितीच्या आधारे आरोपी प्रदिप दामोदर लासुरकार यानेच मुलीला पळुन नेल्याचे निश्पन्न झाले परंतु त्यांनी त्याचा मोबाईल क्रमांक बंद केला होता. एल. सी.बी. च्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारे आरोपी यास रांजणगांव एम.आय.डी.सी., पुणे येथील एका फ्लॅट मधुन अटक करून अपहृत मुलीची सुटका केली.

## महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ अनुसूचित जातींसाठी विविध योजना

▪**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :**

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबाची आर्थिक उन्नती जलद गतीने घडवून आणण्याच्या मुख्य उद्देशाने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची स्थापना दि. १० जुलै १९७८ साली झाली. महामंडळ सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत कार्यरत असून, मागासवर्गाच्या उन्नतीसाठी व कल्याणासाठी कार्यरत आहे. व्यवसाय, उद्योग, शिक्षणाकरिता मदत करणे व विविध योजना आखणे, प्रचालन करणे, मदत करणे, सल्ला देणे, सहाय्य देणे, वित्तीय सहाय्य देणे, संरक्षण देणे यासारखे उपक्रम हाती घेतल्या जातात.महामंडळातर्फे राबवण्यात येणाऱ्या योजनांमध्ये राज्य शासनाची ५० टक्के अनुदान योजना ही लाभार्थीची आर्थिक मदत करण्याचं काम करते त्यामध्ये प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त १० हजार पर्यंत अनुदान देण्यात येते. कर्जाची परतफेड साधारपणे ३ वर्षात बँकेच्या व्याजदरा प्रमाणे होते. अनुसूचित जातीतील युवक - युवतींना व्यवसायासाठी लागणारी तांत्रिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रशिक्षण योजना राबवली जाते. यामध्ये ३ ते ६ महिने पर्यंत शिवणकला, ब्युटी पार्लर, इलेक्ट्रिक, वायरमन, टर्नर,फिटर, रेफ्रिजरेटर आदी तांत्रिक व्यवसायावर विनामूल्य प्रशिक्षण दिले जाते.प्रशिक्षण सुरू असताना प्रशिक्षणार्थींना ३०० ते ६०० रुपयांपर्यंत मासिक विद्यावेतन देण्यात येते. ही योजना युवकांच्या कौशल्य विकासाला चालना देऊन विविध क्षेत्रातील रोजगाराचे द्वार त्यांच्यासाठी खुले करण्याचे काम करते. महामंडळास प्राप्त होणाऱ्या भाग भांडवलातून बीज भांडवल योजना शेतकऱ्यांकरिता राबविण्यात येते. त्यामध्ये ५१ हजार ते ५ लाखांपर्यंत प्रकल्पाची मर्यादा असून मर्यादेच्या २० टक्के बीज भांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ टक्के व्याजदराने देण्यात येते. त्यामध्ये १० हजार रु. अनुदान महामंडळातर्फे देण्यात येते.

## जुने शहरवासी कावडधारी मंडळाचे शिवभक्त त्र्यंबकेश्वरला रवाना

▪**तेल्हारा,दि २८ (प्रतिनिधी) :** जुने शहरवासी शिवभक्तांचे कावडधारी २६ जुलै रोजी त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथे गोदावरीचे पवित्र गंगाजल भरून आणण्याकरिता शहरातून ढोल ताशांच्या गजरात ३१ भरण्याची शोभायात्रा काढून प्रस्थान केले. ६३ हून अधिक शिवभक्त त्रंबकेश्वर ते तेल्हारा पंधरा दिवसांचा पायी प्रवास करत गौतमेश्वर तेल्हारा येथे येणार आहे. गंगाजलाने भगवान गौतमेश्वर महादेवाचा जलाभिषेक केला जाणार आहे. ही यात्रा केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक एकतेचं प्रतीक मानली जाते. या कावड यात्रेत जुने शहरवाशी शिवभक्त मोठ्या प्रमाणात सहभागी झाले आहेत यात्रेची वैशिष्ट्ये व आयोजनः या यात्रेसाठी शिवभक्तांनी ३१ भरण्याची खास कावड तयार केली असून परतीच्या प्रवासात त्यात गौतमेश्वर हे तेल्हारा तालुक्यातील प्रसिद्ध शिवस्थळ असून येथे दरवर्षी श्रावण महिन्यात गौतमेश्वर महादेवाची विशेष पूजा व जलाभिषेक केला जातो. कावड यात्रा ही त्या परंपरेचा एक अनिवार्य भाग बनली आहे. जुने शहर वाशी मंडळाकडून मागील वर्षी ओंकारेश्वर ते तेल्हारा निघाली होती कावड यात्रा ही कावड यात्रा श्रद्धेचा आणि शिस्तीचा अनुपम संगम असून, शिवभक्ती, सामाजिक ऐक्य आणि ग्रामीण संस्कृतीचे जिवंत दर्शन घडवणारी यात्रा ठरत आहे.

## जिल्ह्यात जनावरांमध्ये लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव

▪**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :**

अकोला, नांदखेड, भिकूनखेड व गाजापूर येथील जनावरांत लम्पी त्वचाआजाराचा प्रादुर्भाव झाल्याचा अहवाल पुणे येथील पशुसंवर्धन रोग व अन्वेषण सहआयुक्त कार्यालयाने दिला आहे. त्यानुसार ही गावे नियंत्रित क्षेत्रे म्हणून घोषित करण्यात आली असून, या क्षेत्रातील गुरांचे बाजार, वाहतूक व इतर बाबींसंदर्भात मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत.

जिल्हा दंडाधिकारी अजित कुंभार यांनी याबाबतचा आदेश निर्गमित केला. अकोला तालुक्यातील अकोला, अकोट तालुक्यातील नांदखेड, बाळापूर तालुक्यातील भिकूनखेड व मूर्तिजापूर तालुक्यातील गाजीपूर येथील

### नियंत्रित क्षेत्रे घोषित, मनाई आदेश लागू

जनावरांत लम्पी या त्वचा आजाराचा प्रादुर्भाव झाल्याचा अहवाल प्रशासनाला प्राप्त झाला. त्यानुसार संसर्ग केंद्रापासून १० किमी बाधित क्षेत्र व निगराणी क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.नियंत्रित क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. गुरे, म्हशी प्रजातीचे प्राणी अन्यत्र किंवा नियंत्रित क्षेत्राबाहेर नेण्या-आणण्यास मनाई करण्यात आली आहे. गोजातीय प्रजातीचे जिवंत अथवा मृत प्राणी कोणत्याही बाधित झालेल्या प्राण्याच्या संपर्कात आलेली वैरण, साहित्य, कातडी, प्राण्यापासूनचे अन्य उत्पादन नियंत्रित क्षेत्रातून बाहेर नेण्यास मनाई घालण्यात आली आहे.

नियंत्रित क्षेत्रात गुरांचे बाजार, शर्यती, जत्रा, प्रदर्शन यांना मनाई आहे. परिसरात किटक निर्मूलनासाठी स्वच्छता, फवारणीचे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आले आहेत. बाधित जनावर मृत झाल्यास पशुवैद्यकीय अधिका-यांच्या मार्गदर्शनानुसार शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावावी. निरोगी जनावरांना बाधा होऊ नये म्हणून ती वेगळी ठेवावीत. पशुंना आवश्यकतेनुसार प्रतिजैविके द्यावीत. बाधित क्षेत्राच्या ५ किमी अंतरातील गो व महिषवर्गीय पशुंना गॉट पॉक्स लस द्यावी, आदी आदेश देण्यात आले आहेत.

# रीकच्या पुनरुज्जीवनातील अडचणी, फायदे आणि तोटे

रिक ट्रोईका ! रिक (RIC) म्हणजे रशिया, इंडिया, चायना, ट्रोईका म्हणजे तीन देशांची संघटना . म्हणून रशिया इंडिया व चायना या तीन देशांच्या संघटनेचे हे संक्षिप्त नांव आहे.

१९९० च्या दशकात या संघटनेची स्थापना झाली. स्थापनेची मूळ कल्पना रशियाची होती. रशियाचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री येव्हगेनी प्रिमाकोव्ह यांनी अशा प्रकारच्या संघटनेचा विचार व्यक्त केला. अशा प्रकारच्या संघटनेमुळे या तीन जागतिक शक्तिशाली देशामध्ये राजकीय आर्थिक व सामाजिक सहकार्य वाढून बहु ध्रुवीय जागतिक सत्ता निर्मिती करण्यास मदत होईल, हा उद्देश होता.

यासंदर्भात या देशांच्या बऱ्याच बैठकाही झाल्या. मात्र जून २०२० मध्ये भारत व चीन यांच्या दरम्यान उद्भवलेल्या सीमा वादा नंतर या संदर्भात बैठका झाल्या नाहीत. आणि पंधरा वर्षापासून बैठका नसल्याने संघटन जणू निष्क्रिय झाली आहे. मात्र आताही रशियानेच पुढाकार घेऊन रीकच्या पुनरूज्जीवनाचा मनोदय जाहीर केला आहे.

**पुनरुज्जीवना मागील पार्श्वभूमी**

डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेच्या राष्ट्रपती पदासाठी दुसऱ्या वेळेस निवडून आले. त्यावेळेसच त्यांनी यापुढील राजकारणात अमेरिका प्रथम, हे धोरण राबविल्या जाईल असे जाहीर केले. कोणत्याही राष्ट्र प्रमुखाने स्वतःच्या राष्ट्राच्या विकासाला व उन्नतीला प्राधान्य देणे यात गैर काहीच नाही.

परंतु आपल्या ध्येयप्राप्तीसाठी त्यांनी अन्य देशांना धमकावण्याचे धोरण सुरू केले. जी राष्ट्रे आपले म्हणणे ऐकणार नाहीत त्यांच्या बाबतीत आपण अतिरिक्त आयात शुल्क आकारू अशी त्यांनी कल्पना देऊन तसेच याबाबत काही राष्ट्रांना लेखी सूचना देऊन एक प्रकारे टैरिफ युद्धाला सुरुवात केली आहे.

युक्रेन रशिया युद्धाला सुरुवात झाल्यानंतर अमेरिकेने रशियावर आर्थिक बंधने लादली होती. तसेच रशियाकडून तेल व गॅसच्या संदर्भात कोणीही व्यवहार करू नये अशी बंधने अन्य देशावरही घातली. असे असतानाही तेव्हा भारताने रशियाकडून तेल व गॅस स्वस्त दरात मिळत असल्याने व्यापार सुरू ठेवला. ट्रम्प यांनी त्यांच्या निवडणुकीचा प्रचार करताना आपण पुन्हा राष्ट्रपती झाल्यास युक्रेन रशियामधील युद्ध पंधरा दिवसात थांबवू अशी वल्गनाही केली होती. मात्र तसे घडले नाही.

तेव्हा डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन, भारत व ब्राझील यांच्यावर युक्रेन रशिया युद्ध थांबविण्यासाठी रशियावर दबाव आणावा अन्यथा त्यांच्यावर शंभर टक्के अतिरिक्त शुल्क आकारल्या जाईल अशी ही धमकी दिली.

ब्राझील रशिया भारत हे ब्रिक्स संघटनेचे प्रमुख देश आहेत. हे ब्रिक्स देश आपसातील आर्थिक व्यवहारासाठी एक वेगळे चलन ठरवण्याच्या विचारात आहेत. याचीही कूणकूण लागल्याने यामुळे आपल्या डॉलरचा प्रभाव कमी होण्याची शक्यता आहे हे लक्षात घेऊन ट्रम्प यांनी ब्रिक्स संघटनेने वेगळे चलन निर्माण केल्यास संबंधित देशांची आर्थिक व्यवस्था डबघाईला आणू अशी धमकी दिली.

नाटोचे प्रमुख असलेले मार्क रुट्टे यांनीही भारताने रशियाशी व्यापार करु नये, तसेच रशियाचे युक्रेनशी असलेले युद्ध थांबवण्यासाठी रशियावर दबाव आणावा असे म्हटले आहे. आणि तसे न केल्यास त्यांचेवर अतिरिक्त आयात शुल्क आकारला जाईल अशी धमकी दिली आहे. नाटो हे ३५ राष्ट्राचे संघटन असल्याने ही धमकी ३५ राष्ट्रांतर्फेच आहे असे मानल्यास वावगे ठरू नये.

भालचंद्र पांडुरंग ठोंबरे
९८३४३५०८९५

या पार्श्वभूमीवर मार्क रुटे यांच्या धमकीवर प्रतिक्रिया देताना भारताने आपल्या देशासाठी व देशातील नागरिकांसाठी जे हिताचे ठरेल तसा व्यापार केल्या जाईल असे स्पष्ट केले. वास्तविक पाहता भारत रशियाकडून तीन महिन्यात जेवढे तेल खरेदी करतो तेवढे तेल युरोपीय देश एका दिवसात खरेदी करतात.अशी चर्चा आहे. मात्र अमेरिका व मार्क रुटे भारताला टारगेट करीत आहेत. हे सर्व भारताने रशियाशी व्यापार करू नये यासाठी वापरण्यात येत असलेले दबाव तंत्र आहे हे स्पष्ट होते.

**रीकच्या पुनरुज्जीवनाचा मनोदय**

या पार्श्वभूमीवर रशियाने पूढाकार घेवून रीक ट्रोईकाला पुनर्जीवित करून सक्रिय करण्याचा मनोदय जाहीर केला. त्या संदर्भात भारत व चीनशी बोलणी सुरू असल्याचेही म्हटले आहे. चीन ने ही रशिया, भारत व चीन यांचा त्रिपक्षीय सहयोग या देशांच्या तसेच क्षेत्र व जागतिक सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा व अत्यंत आवश्यक असल्याचे सांगून एक प्रकारे भारताला निमंत्रण व रशियाच्या सूचनेचे समर्थन केले आहे.

पश्चिमेकडील राष्ट्रांच्या दृष्टिकोनातून जागतिक राजकारणात एकटा परंतु सैनिक दृष्ट्या समर्थ असलेला रशिया, आर्थिक व्यवहारातून आपला दबाव निर्माण करणारा चीन, आणि वेगाने वाढणारी आर्थिक अर्थव्यवस्था असणारा भारत यांचा एकत्रित संघ पून्हा सक्रीय झाल्यास अमेरिकेसाठी प्रबळ प्रतिस्पर्धी निर्माण होईल. या संभाव्य भीतीमुळेच भारताला धमकावून या संभाव्य संघटनेपासून दूर ठेवण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे.

**रीक ट्रोईका संघटना पुनर्जीवित झाल्यास खालील प्रकारचे संभाव्य फायदे होण्याची शक्यता आहे.**

१) रशिया भारत व चीन राष्ट्रीय एकत्र आल्यास बहुपक्षीय संवादाचे व्यासपीठ तयार होऊन द्विपक्षीय हिताऐवजी त्रिपक्षीय हित जोपासता येईल अशी शक्यता आहे.

२) तीन राष्ट्रांच्या एकत्रित गुंतवणूक व व्यापारीक धोरणामुळे आर्थिक सहकार्य वाढेल. ऊर्जा तंत्रज्ञान इन्फ्रास्ट्रक्चर आदी क्षेत्रात संयुक्त प्रकल्पांना उत्तेजन मिळण्याची शक्यता आहे.

३) या राष्ट्रांच्या माध्यमातून बहुधृवीय जागतिक व्यवस्था निर्माण होऊ शकते. तसेच संयुक्त राष्ट्र संघा च्या सुधारणेसाठी सहकारी ठरू शकते.

४) रिकच्या पुनरुज्जीवनाने ब्रिक्स व शांघाय सहकार्य संघटना अधिक प्रभावी होण्यास मदत होऊ शकते.

**मात्र, या सोबत भारतासाठी काही प्रकारचे तोटे सुद्धा होण्याची शक्यता आहे.**

१) भारत, रशिया चीन यांच्या एकत्रित संघटनेमुळे रशिया व चीनमध्ये सहकार्य वाढून भारत चीन सीमा प्रश्नासाठी ते घातक ठरू शकते.

२) वैचारिक धोरणात्मक विरोधाभास- भारताचे पश्चिम राष्ट्रातील असलेले संबंध धोक्याची येण्याची शक्यता आहे. रीक मध्ये भारत रशिया चीन एकमेकांशी सहकार्यासाठी बद्ध असतील तर अमेरिके सोबत भारत क्वाडमधे असून इंडो पॅसिफिक महासागरात चीनच्या वाढत्या प्रभावाला आळा घालणे हा क्वाडचा उद्देश आहे. एकाच वेळी चीनला सहकार्य करणे व त्याच्या वाढत्या प्रभावाला आळा घालणे या वैचारिक विरोधामुळे कोणत्यातरी एका संघटनेत भारताचे सहकार्य मर्यादित होऊ शकते.

३) त्रिपक्षीय संघटनेत रशिया चीनच्या वाढत्या लष्करी व आर्थिक सामर्थ्या मुळे निर्णय प्रक्रियेत त्यांचा प्रभाव राहून भारतासाठी ते धोक्याचे ठरू शकते.

मात्र हे संघटन पूनरज्जीवित होवून सक्रिय होण्यास खालील प्रमुख अडचणी आहेत. या अडचणीवर तोडगा निघाल्यासच हे संघटन होण्याची शक्यता आहे.

**अडचणी**

१) हे संघटन निर्माण होण्यास प्रमुख अडचण म्हणजे चीनचा विश्वासघातकी स्वभाव व त्याचे विरोधी धोरण. भारत एक वेळेस रशियावर विश्वास ठेवू शकतो, कारण रशिया भारताचा जुना मित्र आहे. मात्र चीन संदर्भात भारताला नेहमीच विश्वासघतकी पणाचा अनुभव आलेला आहे.

१९६२ युद्धाचा अनुभव, बळकावलेला अक्साई, सतत अरुणाचल प्रदेशाबद्दल निर्माण करीत असलेला सीमावाद, भारता शेजारील नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, पाकिस्तान आदी राष्ट्रांना भारत विरोधात चिथावणी देऊन सतत भारत विरोधात सहकार्य करणे, भारत वगळून शेजारील राष्ट्राची सार्क संघटना निर्मितीचा प्रयत्न, भारत पाक संघर्षामध्ये पाकिस्तानला शस्त्रासह मदत करणे, अशा कितीतरी विश्वासघातकी घटनांचा अनुभव भारतासमोर आहे. यामुळे चीन कितपत बदलला व चीनवर कितपत विश्वास ठेवावा यावरच भारताचे रिक मध्ये सामील होणे अवलंबून असेल. शेवटी राजकारणात काहीही घडवू शकते.

२) जागतिक राजकारणाच्या संदर्भात भारत आजपर्यंत कोणत्याही गटात सामील न राहता भारताचे धोरण तठस्थतेचे राहिले आहे. परंतु या त्रिपक्षीय संघटनेत सामील झाल्यास भारताचा हा तटस्थपणा अडचणीत येऊ शकतो.

३) भारत इजराइल संबंधावर याचा परिणाम होण्याची दाट शक्यता आहे.

एकंदरीत रीकचे पुनरुज्जीवन अमेरिकेच्या जागतीक प्रभावाला एक समर्थ पर्याय ठरून एक जागतिक समांतर सत्तासंरचना उभी राहू शकते. परंतु त्यासाठी चीन भारत व रशिया यांच्यात परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे.

# शेख हसीना पुनरागमन करणार?



बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांनी ५ ऑगस्ट २०२४ रोजी बांगलादेश मधून पलायन केले आणि त्या भारताच्या आश्रयाला आल्या. त्यानंतर नोबेल पारितोषिक विजेते आणि अर्थतज्ज्ञ मोहंमद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरीम सरकार बांगलादेशमध्ये सत्तेवर आले.

हे सरकार सत्तेवर आल्यापासून, बांगलादेशमध्ये अनेक घडामोडी घडल्या आहेत. कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती पूर्णपणे कोलमडली आहे. अवामी लीग या बांगलादेश मधील सर्वात मोठ्या राजकीय पक्षावर बंदी घालण्यात आली आहे. अवामी लीगच्या कार्यकर्त्यांना जेलमध्ये टाकण्यात येत आहे.

शेख हसीना आणि त्यांच्या कुटुंबाला बदनाम करण्यात येत आहे. बांगलादेशचे पितामह शेख मुजिबर रेहमान यांच्या घरावर हल्ला करुन त्याची मोठ्या प्रमाणात नासधूस करण्यात आली. शेख मुजिबर रेहमान यांचे पुतळे पाडण्यात आले. बांगलादेशच्या चलनी नोटांवर बंगबंधू शेख मुजिबर रेहमान यांचे छायाचित्र आहे,ते काढून टाकण्याच्या कारवाया सुरू आहेत.

एकंदरीत बांगलादेशमध्ये सध्या जनतेला अपेक्षित असे काहीच घडताना दिसत नाहीये. शेख हसीना यांनी पलायन केल्यानंतर,त्यांच्या जागी आलेल्या मोहंमद युनूस यांच्याकडून जनतेच्या मोठ्या अपेक्षा होत्या, परंतु त्यांनी जनतेची घोर निराशा केली आहे. बांगलादेश मधील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने लवकरात लवकर निवडणुका घेण्याची मागणी केली आहे, परंतु मोहंमद युनूस यांनी त्याबाबतीत ठोस असा निर्णय घेतलेला नाही.

बांगलादेश स्वातंत्र्य संग्रामात पाकिस्तानी लष्कराला मदत करणाऱ्या कट्टरपंथी जमाते इस्लामी या पक्षावर शेख हसीना यांनी, त्या पंतप्रधान असताना बंदी घातली होती परंतु मोहंमद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरीम सरकारने जमाते इस्लामी पक्षावरील बंदी उठवली आहे.नुकतीच ढाका येथे जमाते इस्लामी पक्षाची सभा झाली. त्या सभेला पक्षाच्या पाठराख्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.



अभय गोखले

पूर्वार्ध

जमाते इस्लामी पक्षाची भूमिका नेहमीच भारत विरोधी राहिलेली आहे. त्यांना मोहंमद युनूस यांचा पाठिंबा आहे. जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये कोटा सिस्टीमच्या विरोधात विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात आंदोलन केले होते. त्या आंदोलनातील विद्यार्थी नेत्यांनी नॅशनल सिटिझन्स पार्टी या पक्षाची स्थापना केली असून या पक्षाची, जमाते इस्लामी या पक्षाबरोबर असलेली जवळीक पाहता, भविष्यात बांगलादेश मधील राजकीय स्थिती अजून खराब होण्याची शक्यता आहे.

बांगलादेश मधील सध्याची बिघडलेली स्थिती पाहता, शेख हसीना यांची राजवट यापेक्षा बरी होती,असे लोक उघडपणे बोलू लागले आहेत.

सुप्रसिद्ध पत्रकार आणि लेखक मानस घोष यांनी मुजिबज ब्लंडर्स : द पॉवर अँड द प्लॉट बिहाईंड हिज किलिंग या त्यांच्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात बोलताना असे सांगितले की शेख हसीना आणि त्यांचा पक्ष अवामी लीग हे बांगलादेशात पुन्हा सत्तेवर येऊ शकतात, फक्त त्यांनी आपली कार्यपद्धती बदलली पाहिजे. अवामी लीग हा पक्ष संपवला जाऊ शकत नाही,कारण त्याची पाळेमुळे बांगलादेश मध्ये खोलवर रूजलेली आहेत.

घोष म्हणाले की शेख हसीना आणि त्यांच्या पक्षाने यापूर्वी यापेक्षा जास्त संकटांचा सामना केला आहे. त्यामुळे त्या पुनरागमन करतील याबाबत शंका नाही.

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

# नागपंचमीच्या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण

श्रावण महिना आला की आगळे-वेगळे वातावरण निर्माण होते व सणांना सुरूवात होवून सर्वत्र उत्साह दिसून येतो. श्रावण महिन्यात नागपंचमीला अत्यंत महत्व दिले जाते. नागपंचमीच्या दिवशी घरोघरी नागाच्या प्रतिमेची पूजाअर्चना केली जाते.

नागपंचमीचा उल्लेख आपल्याला अनेक पुराणांमध्ये सुध्दा पहायला मिळतो. नागपंचमीचे महत्व भगवान श्रीकृष्णांशी सुध्दा निगडित आहे.

दर १२ वर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथ संप्रदायाचे लोक गंगा-गौतमी (अहिल्या - गौतमी) संगमावर स्नान करतात. या दिवशी शेतकरी शेतात नांगर, वखर, कोणतेही खोदकाम करीत नाही. घरकामात अवजारांचा वापर केला जात नाही. भाज्या चिरायच्या नाही, तव्याचा वापर नाही, कांडन नाही, कापन नाही, असे काही नियम आजही पाळले जातात.

नागपंचमीच्या दिवशी श्रद्धाळू नागदेवतेच्या फोटोंची किंवा मुर्तीची पुजाअर्चना करून दूध-लाह्यांचा व शिऱ्याचा प्रसाद करून नैवेद्य दाखवतात आणि शेतीचे व आपले संरक्षण करण्यासाठी सर्वच प्रार्थना करतात. श्रावण महिन्यातील सोमवार हा उपवास बहुतेक सर्वच जण करतात व मोठ्या भक्तिभावाने शंकराची, शंकराच्या पिंडेची व नागाची पुजाअर्चना करतात.

नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण असल्याने सर्वत्र आनंदी वातावरण दिसून येते. आज वन्य जीव संरक्षण कायद्यामुळे अनेक प्राण्यांना जीवनदान मिळाले आहे. संपूर्ण प्राणीमात्रांची जोपासना करण्याचे दायित्व आपणासर्वांवर आहे.

श्रावण महिन्याचे व नागपंचमीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे. यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील व वन्यप्राण्यांना जंगलात रहाण्याचा आनंद मिळेल.आज पृथ्वीला वाचवायचे असेल तर प्रत्येक सणांना मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे अत्यंत गरजेचे आहे सर्वांसाठीच वृक्ष अनिवार्य आहे. पृथ्वी संरक्षित राहिली तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित राहील अन्यथा विनाश अटळ आहे.

याकरीता येणाऱ्या विनाशापासुन वाचण्यासाठी झाडे लावा जीव सृष्टी वाचवा हा मूलमंत्र सर्वांनीच अंगिकारला पाहिजे. नागव्दार स्वामी की जय! जय नाग देवता !हर हर महादेव!

----------------

■ रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

## वाचक लिहितात

### गोमातेची सेवा म्हणजे ईश्वरसेवा...

भारतीय संस्कृतीत गायीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. गाईला गोमाता म्हणून पूजले जाते. देवी-देवतांचा वास गायीत असतो, असे मानले जाते. गोपाष्टमी, दीपावलीतील गोवर्धन पूजा अशा विविध सणांमध्ये गाईची पूजा केली जाते.

तसेच, आर्थिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही गायीचे अत्यंत महत्त्व आहे. पारंपरिक कृषी व्यवस्था गायीवर आधारित आहे. गायीचे शेण आणि गोमूत्र सेंद्रिय शेतीसाठी उपयुक्त असून, ते पर्यावरणपूरक मानले जाते.

असे असून देखील, आज सर्वत्र गोहत्येचे प्रमाण सतत वाढत आहे. दररोज कुठे न कुठे गोवंश चोरी वा गोहत्या होत असल्याच्या बातम्या वाचनात येतात.महाराष्ट्रात २०१५ पासून गोहत्या प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आहे. मात्र, भ्रष्टाचार, अपुऱ्या यंत्रणा आणि स्थानिक राजकीय दबाव यामुळे कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही.

तेव्हा गोहत्या प्रतिबंधक कायद्यांची कडक अंमलबजावणी करून दोषींना कठोर शिक्षा देणे जितके आवश्यक आहे, तितकेच गोसेवा म्हणजेच देशसेवा आणि ईश्वरसेवा हे पुन्हा एकदा जनमानसात बिंबवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी शाळा, मंदिरे आणि गावांमध्ये मेळावे आणि कार्यशाळांचे आयोजन करून त्याद्वारे गोसेवेचे आध्यात्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व जनतेला पटवून देणे ही काळाची गरज आहे.

■ डॉ. सौ. स्वाती देशमुख
नागपूर.

### नागपंचमीचा इतिहास

भारतीय संस्कृती ही सर्व प्राणीमात्रात ईश्वर बघणारी संस्कृती आहे.

नागपंचमी हा सण, सणांचा राजा असलेल्या श्रावण मासातील पहिला सण.श्रावण शुद्ध पंचमी या दिवशी नागपंचमीचा सण साजरा केला जातो..यावर्षी नागपंचमी २९ जुलैला आहे. या दिवशी नागदेवतेची पूजा करणे, म्हणजे सगुण रूपातील शिवाची पूजा करणे होय. पंचमीचा इतिहास बघता कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होय. सागर मंथनाच्या वेळी भगवान शिव जेव्हा हलाहल विष प्यायले तेव्हा शिवाला सहाय्य करण्यासाठी नऊ नाग आले. त्यांनी हलाहलाचा अंश प्राशन केला. त्यामुळे शिव नागांवर प्रसन्न झाले. नागांनी समस्त सृष्टीचे रक्षण करण्यासाठी दिलेल्या योगदानासाठी'मनुष्याने नेहमी नागां प्रति कृतज्ञता म्हणून तो नागपंचमी पूजा करेल' असा आशीर्वाद नागांना दिला आणि तेव्हापासून हे नऊ नाग मनुष्याला पूजनीय झाले.

'अनन्तं वासुकि शेषं पद्मनाभं च कम्बलम्।
शंखपालं धृतराष्ट्रंच तक्षकं कालियं तथा ॥

अशी या नागांची नावे आहेत, हा श्लोक म्हणून आपण एका पाटावर चंदनाने नाग काढून त्याची मनोभावे पूजा करून नागदेवतेला प्रार्थना करूया.

■ रमा देशमुख, नागपूर.




# रोबोटने पहिल्यांदा बॅटरी कशी बदलली?

चीनमधील UBTECH रोबोटिक्स या कंपनीने जगातील पहिला मानवासारखा रोबोट तयार केला आहे जो स्वतःची बॅटरी बदलू शकतो. या क्षमतेमुळे, हा रोबोट कोणत्याही मानवी मदतीशिवाय आठवड्यातून २४ तास सतत काम करू शकेल.

'वॉकर एस२' नावाचा हा अनोखा रोबोट ५ फूट ३ इंच उंच आणि सुमारे ४३ किलो वजनाचा आहे. त्यात २० सांधे आहेत जे त्याला अतिशय लवचिकपणे हालचाल करण्यास मदत करतात. तो वाय-फाय आणि ब्लूटूथशी देखील कनेक्ट होऊ शकतो.

**बॅटरी रिप्लेसमेंट फीचर कसे काम करते?**

वॉकर एस२ मध्ये ४८-व्होल्ट लिथियम बॅटरी आहे जी 'ड्युअल-बॅटरी सिस्टम'वर काम करते. यामुळे रोबोटला एकदा चार्ज केल्यानंतर दोन तास चालण्याची किंवा चार तास उभे राहण्याची शक्ती मिळते.

बॅटरी पूर्णपणे चार्ज होण्यासाठी सुमारे ९० मिनिटे लागतात. जेव्हा एक बॅटरी संपते तेव्हा रोबोट आपोआप ती काढून टाकतो आणि दुसरी चार्ज केलेली बॅटरी वापरतो. UBTECH रोबोटिक्सची स्थापना मार्च २०१२ मध्ये झाली.

# श्रावणात घन निळा बरसला..

श्रावण महिना हा हिंदू पंचांगानुसार आणि भारतीय सौर दिनदर्शिकेनुसार वर्षातला पाचवा महिना आहे. या महिन्याच्या पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्रात असतो, त्यावरून या महिन्याला श्रावण असे नाव मिळाले आहे.

भारतीय राष्ट्रीय दिनदर्शिकेतला श्रावण महिना हा जुलैच्या उत्तरार्धात पौर्णिमेपासून सुरू होतो आणि ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात पुढील पौर्णिमेच्या दिवशी संपतो. तमिळ कॅलेंडरमध्ये तो ह्यअवनीह्म म्हणून ओळखला जातो आणि तो सौर वर्षाचा पाचवा महिना असतो. चंद्र धार्मिक कॅलेंडरमध्ये श्रावण हा अमावस्येपासून सुरू होतो आणि तो वर्षाचा पाचवा महिना असतो. श्राबोन हा सौर बंगाली कॅलेंडरचा चौथा महिना आहे, तसेच नेपाळी कॅलेंडरचा चौथा महिना असतो. श्रावण हा वर्षा ऋतुचा (पावसाळ्याचा) दुसरा महिना असतो.

साधारणतः ८ किंवा ११ आणि क्वचित १९ वर्षांनी अधिक श्रावेतो. त्या महिन्यात येणाऱ्या शुक्ल किंवा वद्य या दोन्ही एकादश्यांना कमला एकादशी हे नाव आहे. उत्तर हिंदुस्थानात या एकादश्यांना अनुक्रमे पद्मिनी आणि परम एकादशी म्हणतात. एकादश्या वगळल्या तर अधिक श्रावणात कोणतेही हिंदू सण किंवा व्रताचे दिवस येत नाहीत. ज्यावर्षी अधिक श्रावण असतो त्यावर्षी पाच महिन्यांचा चातुर्मास असतो.

चातुमार्सात लग्ने होत नसल्याने ती अधिक श्रावणातही होत नाहीत. श्रावण महिन्याला सर्व सणांचा राजा म्हटले जाते. श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा वा व्रत करण्याची हिंदू आणि जैनधर्मीयांची परंपरा आहे.

या विशिष्ट महिन्यात केल्या जाणाऱ्या शंकराच्या उपासनेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. संपूर्ण भारतीय उपखंडासाठी श्रावण महिना खूप महत्त्वाचा आहे कारण तो नैऋत्य मान्सूनच्या आगमनाशी जोडलेला आहे. श्रावण शुद्ध पंचमीच्या दिवशी नागांची पूजा करण्याची परंपरा भारतीय संस्कृतीत प्रचलित आहे.

तसेच रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा हा सण हिंदू महिन्यांपैकी श्रावण महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. या दिवशी समुद्रकिनारी राहणारे लोक वरुणदेवते प्रित्यर्थ समुद्राची पूजा करून त्याला नारळ अर्पण करतात.

या दिवशी मासेमारी करणारे महाराष्ट्रातले कोळी व समुद्राशी निगडित असलेल्या व्यवसायांतील इतर लोक समुद्राची पूजा करून त्यास नारळ अर्पण करतात. पावसाळ्यात बंद असलेले मासे पकडणे या दिवसापासून परत सुरू होते. ज्या कुटुंबात रोजच्या खाण्यात नारळ नसतो, त्याही मराठी घरांमधून या दिवशी नारळीभात, नारळाच्या वड्या यांसारखे नारळापासून बनलेले खाद्य पदार्थ बनवतात.

याच दिवशी बहीण भावाच्या हातात राखी बांधते त्यावरून या पौर्णिमेला राखी पौर्णिमा असे म्हणतात. ही पौर्णिमा पोवती पौर्णिमा म्हणूनही ओळखली जाते, कारण या दिवशी सुताची पोवती करून ती विष्णू, शिव, सूर्य इत्यादी देवतांना अर्पण करतात व मग कुटुंबातील स्त्री-पुरुष ती पोवती हातात बांधतात.

या दिवशी श्रवण नक्षत्र असल्याने ब्राह्मण पुरुष उपाकर्म करून नवीन यज्ञोपवीत धारण करतात. या विधीला श्रावणी असे नाव आहे. श्रावणी ही श्रावण पौर्णिमेलाच करतात असे नाही, श्रावणी हस्त नक्षत्रात चंद्र असताना 'श्रावण शुक्ल पंचमी'लाही असू शकते. पौर्णिमेला चंद्रग्रहण असल्यास श्रावण पौर्णिमेला श्रावणी नक्कीच करत नाहीत.



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

ऋग्वेद्यांची श्रावणी, यजुर्वेद्यांची श्रावणी, तैत्तिरीय शाखा व तिच्या अंतर्गत येणाऱ्या हिरण्यकेशी उपशाखेच्या ब्राह्मणांची श्रावणी या वेगवेगळ्या दिवशी असू शकतात.

श्रावण महिन्यात लागोपाठच्या दोन दिवशी पौर्णिमा असेल, तर पहिल्या दिवशी नारळी पौर्णिमा आणि दुसऱ्या दिवशी राखी पौर्णिमा असते. राखी पौर्णिमेच्या दिवशी भारताच्या उत्तराखंड राज्याच्या चंपावत जिल्ह्यातल्या देईपुरी इलाख्यात बरही देवीला खुश करण्यासाठी गावातल्या दोन गटांत एकमेकांवर दगडफेक होते. दगडफेकीत अनेकजण घायाळ होतात. २०१९ साली १२० लोक जखमी झाले होते. मात्र हायकोर्टाने दगडफेकीवर बंदी आणल्याने काही लोकांनी दगडांऐवजी सफरचंदे फेकून मारली.

उत्तर भारतात या महिन्यात झुलन यात्रा, रक्षाबंधन, जन्माष्टमी व नंदोत्सव हे उत्सव विशेष महत्त्वाचे मानतात. झुलन जत्रा हा दोलोत्सव आहे. पौर्णिमेच्या दिवशी राधा व कृष्ण यांना हिंदोळ्यावर बसवून झोके देतात व स्त्रिया त्यांच्यासंबंधी गीते गातात.

हा उत्सव एकादशी पासून पौर्णिमेपर्यंत चालतो. कृष्ण जन्माच्या दुसऱ्या दिवशी नंदोत्सव करतात. नंदाला पुत्र झाला असे समजून या दिवशी हळदी-कुंकू मिसळलेले पाणी पिचकारीने उडवतात. श्रावण मास सुरू झाला आहे आणि या महिन्याचा पहिला सोमवार निमित्त श्रावण सोमवारच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

# बीटचे सेवन आरोग्यासाठी फायदेशीर



आपले आरोग्य तंदुरस्त राहावे यासाठी आपण आपल्या आहारात अनेक आरोग्यदायी पदार्थांचे सेवन करत असतो. तसेच अनेकजण डाएट देखील करतो. तसेच चांगल्या आरोग्यासाठी बीटाचे सेवन तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. आपल्यापैकी अनेकजण बीटाचे सेवन करणे टाळतात. तर काहीजण सॅलडमध्ये बीट मिक्स करून त्याचे सेवन करतात. त्यात मॅंगनीज, पोटॅशियम, लोह, फोलेट, व्हिटॅमिन बी ६, सी आणि ए सारखे आवश्यक पोषक घटक असतात.

बीटमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे त्वचेचे सूर्याच्या किरणांपासून संरक्षण करतात आणि त्वचेच्या सर्व समस्यांपासून मुक्त होण्यास मदत करतात. त्यात असलेले व्हिटॅमिन सी कोलेजन तयार करण्यास मदत करते, जे त्वचा घट्ट आणि मऊ ठेवते.

शरीरात हिमोग्लोबिनची कमतरता असेल तर बीट हा एक सोपा आणि प्रभावी उपाय आहे. त्यात मुबलक प्रमाणात लोह असते, जे रक्त वाढवण्यास मदत करते. बीटमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे शरीराची रोगांशी लढण्याची प्रतिकारशक्ती वाढवते. यामध्ये असलेले नायट्रेट्स मेंदूमध्ये रक्त प्रवाह वाढवतात, ज्यामुळे मेंदू तीक्ष्ण होतो. तसेच, बेटेन नावाचा घटक मूड सुधारतो आणि नैराश्याला देखील प्रतिबंधित करतो.

बीटमध्ये भरपूर फायबर असल्याने, ते पचनसंस्था सुधारते आणि पोट साफ करण्यास मदत करते. बीटमध्ये बेटानिन नावाचा घटक असतो, जो कर्करोगाशी लढण्यास मदत करतो. संशोधनात असे आढळून आले आहे की त्याचा रस स्तन, पोट आणि आतड्यांमधील कर्करोगाच्या पेशींच्या वाढीस प्रतिबंध करू शकतो. यामध्ये असलेले अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म लिवरला असलेली सुज कमी करते आणि ते निरोगी ठेवतात.

बीट गर्भवती महिलांसाठी खूप फायदेशीर आहे. ते केवळ अशक्तपणा रोखत नाही तर गर्भाशयातील बाळाच्या विकासात देखील मदत करते. ते पाठीच्या कण्याशी संबंधित स्पायना बिफिडा या आजाराला देखील प्रतिबंधित करते.

बीटमध्ये असलेले नायट्रेट शरीरात नायट्रिक ऑक्साईड वायू तयार करते, ज्यामुळे रक्त प्रवाह योग्य राखते. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहतो आणि हृदयरोगाचा धोका कमी होतो.

बीट मध्ये असलेले व्हिटॅमिन ए दृष्टी सुधारण्यास मदत करते.बीटमध्ये फायबरचे प्रमाण जास्त आणि कॅलरीज कमी असतात, जे वजन कमी करण्यास मदत करते.


**बीटमध्ये असलेले पोषक घटक**

व्हिटॅमिन सीः 6%
पोटॅशियमः 8%
मॅंगनीजः 14%
फोलेटः 20%
फायबरः 3.4 ग्रॅम
कार्बोहायड्रेट्सः 6.7 ग्रॅम
प्रथिनेः 1.7 ग्रॅम

**बीट कसे सेवन करावे?**

कच्चे बीट चिरून ते सॅलडमध्ये मिक्स करून सेवन करा.
बीटाचा हलवा बनवून त्याचे सेवन करा.
बीटापासून पराठा बनवून देखील तुम्ही खाऊ शकता.
बीटापासून शिंकजी तसेच डिटॉक्स ड्रिंक बनवून प्या.
सकाळी रिकाम्या पोटी बीटचा रस प्या.

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### ढग फूटी

निसर्गा तू एवढा
कसा झाला रे निष्ठूर
कुठे बरसतो मुसळधार
तर कुठे धोंडी धोंडीचे सुर..

निसर्गा तू बी आता
झालाय कां राजकारणी?
पक्षपाताचे धोरण सोडून
कर सर्वांना समाधान..!

दयाधना पिता आहे तू
आम्ही तुझी मुले
चुकलं आमचं तरी एवढं
कठोर बननं शोभत नाही तुले..

# कॉर्न आलू मसाला चाट

एखाद्या निवांत संध्याकाळी मित्रमंडळींसोबत गप्पांचा फड जमवताना काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. एखाद्या चाट पदार्थामुळे तोंडाला छान चव येते. अशावेळी झटपट तयार होणारी कॉर्न आलू मसाला चाट ही रेसिपी तुम्ही ट्राय करू शकता.

**साम्रगी:** एक कप उकडलेले स्वीट कॉर्न, उकडलेल्या बटाट्याचे काप एक कप, दोन टोमॅटो, एक टेबलस्पून आल्याची पेस्ट, अर्धा टेबलस्पून हळद, प्रत्येकी एक टेबलस्पून जिरेपूड, धनेपूड आणि लाल तिखट, मॅंगी मसाल्याचं एक पाकीट, चिमूटभर हिंग, दोन हिरव्या मिरच्या, अर्धं लिंबू, चिरलेली कोथिंबिर, तीन चमचे तेल, चवीनुसार मीठ

**कृती:** टोमॅटो आणि हिरवी मिरची बारीक चिरून घ्या. एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर त्यात जिरेपूड घालून मंद आचेवर परतून घ्या. आता त्यात हिंग, आल्याची पेस्ट, हिरवी मिरची घालून परता. यानंतर टोमॅटो, हळद, धनेपूड, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घाला. टोमॅटो नीट शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजल्यावर त्यात स्वीट कॉर्न आणि बटाटे घालून हलवून घ्या. कढई झाकून ठेवा. पाच मिनिटांनंतर मध्यम आचेवर कॉर्न–बटाट्याचे मिश्रण परतून घ्या. मग त्यात मॅंगी मसाला घालून हलवून घ्या. गॅस बंद करून लिंबाचा रस आणि कोथिंबिर घाला. कॉर्न आलू चाट तयार आहे. त्यावर शेव आणि कांदा घालून खाता येईल.



झटपट रेसिपी




## शेर की जुबानी

इन अजनबी सी राहों में, जो तू मेरा हमसफर हो जाए, बित जाए पल भर में ये वक्त, और हसीन सफर हो जाए।

मैं चुप कराता हूं, हर शब उमडती बारिश को, मगर ये रोज, गई बात छेड देती है।

राज खोल देते हैं नाजुक से इशारे अक्सर, कितनी खामोश मोहब्बत की जुबान होती है।

# फॉर संडे ब्रंच

संडे ब्रंच हा भन्नाट अनुभव ठरतो. यानिमित्ताने मित्रमैत्रिणींसोबत काही निवांत क्षण अनुभवता येतात. मस्त गप्पाटप्पा करत हादडता येतं. अर्थात यावेळी हटके फॅशन करण्याची संधी मिळते. इथे फॉर्मल्सची काहीच गरज नसते. तुम्हीही संडे ब्रंचचा प्लॅन आखत असाल तर या फॅशन टिप्स फॉलो करा.

❋ एखादा फंकी शर्ट तुमचा लूक बदलून टाकेल. ठेवणीतला ट्रेंडी शर्ट काढा. चिनोज किंवा जीन्ससोबत कॅरी करा. डेनिम शर्टचा पर्यायही तुम्ही निवडू शकता. शर्ट नको असेल तर टी शर्टही कॅरी करता येईल.

❋ पोलो टी शर्ट अशा ऑकेजन्सची शान ठरतो. एखादा पोलो टी शर्ट तुमच्याकडे असायला हवा.



सेलिब्रिटी फॅशन

❋ व्हाईट कुर्ता हा सुद्धा चांगला ऑप्शन आहे. हा कुर्ता सावळ्यांवर उठून दिसतो. प्रत्येक व्यक्तिमत्त्वाला साजेसा हा कुर्ता तुम्ही जीन्स, चिनोज यापैकी कशावरही कॅरी करु शकता. कोणताच ऑप्शन दिसत नसेल तर बिनधास्त व्हाईट कुर्ता घाला.

❋ 'मिनिमलिस्टिक डिझाइन'चे कुर्ते किंवा शर्ट ट्राय करता येतील. संडे ब्रंचसाठी हा सुद्धा उत्तम पर्याय ठरेल.

# आरोग्यदायी 'श्रेष्ठा'

बहुतेक लोक फक्त चांगली नोकरी मिळण्याचे स्वप्न पाहतात. नोकरी मिळाल्यानंतर लोक ते त्यांच्या आयुष्यातील यश मानतात. खूप कमी लोक नोकरीऐवजी स्वतःच्या कामाला प्राधान्य देतात आणि व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतात. दुसरीकडे, नोकरी करणाऱ्यांना नोकरी सोडून व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेणे खूप कठीण होते. आंध्र प्रदेशातील अशाच एका जोडप्याने 'आयटी' क्षेत्रातील नोकरी सोडून शेती करण्याचा निर्णय घेतला. के. मणिकांत आणि नागा वेंकट दुर्गा पवनी ही त्यांची नावे.

के. मणिकांत इन्फोसिसमध्ये काम करत होते. पवनी ॲक्सेंचरमध्ये काम करत होत्या. पण या जोडप्याचा हेतू वेगळा होता. दोघांनीही नोकरी सोडून शेती करण्याचा निर्णय घेतला. मणिकांत यांच्या मते 'आयटी' क्षेत्रात चांगला पगार मिळूनही लोक आजारी राहतात. शिवाय लोकांची जीवनशैलीदेखील खूप वाईट आहे. अशा परिस्थितीत दोघांनीही लोकांचे आरोग्य सुधारण्याचा विचार केला आणि 'श्रेष्ठ' नावाने एक सेंद्रिय स्टोअर उघडण्याचा निर्णय घेतला. या जोडप्याने लोकांचे आरोग्य सुधारण्याची गरज ओळखली. त्याच वेळी, सेंद्रिय शेतकऱ्यांना पीक विकण्याची चिंता असते. अशा परिस्थितीत, या जोडप्याने सेंद्रिय शेतीद्वारे लोकांचे आरोग्य सुधारण्याचा निर्णय घेतला.

या जोडप्याला शेतीबद्दल काहीच माहिती नव्हती. अशा परिस्थितीत त्यांनी सुभाष पालेकर यांच्याकडून नैसर्गिक शेती पद्धतीचे प्रशिक्षण घेतले आणि रसायनांशिवाय सेंद्रिय शेती करायला शिकले.

अचिव्हर



सुरुवातीला मणिकांत यांनी नोकरी करत असतानाच प्रशिक्षण घेतले. पण नंतर शेती करण्यासाठी नोकरी सोडली.

२०१७ मध्ये मणिकांत यांनी त्यांच्या पत्नीसोबत १७ लाख रुपये गुंतवले आणि श्रेष्ठा नावाचे एक स्टोअर उघडले. या जोडप्याने आंबा, बाजरीचे पीठ, तूर डाळ आणि हेल्थ मिक्स पावडर असे अनेक सेंद्रिय आणि आरोग्यदायी उत्पादने बनवली. ती लवकरच लोकांमध्ये लोकप्रिय झाली. या जोडप्याने सेंद्रिय शेतकऱ्यांसोबत काम केले आणि त्यांच्या पिकांना खूप चांगली किंमत दिली. याचा शेतकऱ्यांनाही खूप फायदा झाला.

आज 'श्रेष्ठा'ची उत्पादने खूप लोकप्रिय आहेत. हे जोडपे या व्यवसायातून दरमहा ७.५ लाख रुपयांपर्यंत कमाई करत आहे. त्याच वेळी, 'श्रेष्ठा'ची उलाढाल आज ९० लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

# त्वचेकडे दुर्लक्ष नको

दीर्घायुष्यासाठी चांगले आरोग्य आवश्यक असते. त्याचप्रमाणे सुंदर आणि चमकदार त्वचेसाठी निरोगी त्वचा खूप महत्वाची असते. लोक त्वचेची काळजी घेणारी अनेक उत्पादने वापरतात आणि त्वचेची काळजी घेणारे विविध उपचार घेतात.

मुली त्यांच्या त्वचेची विशेष काळजी घेतात. परंतु या बाबतीत मुलांना थोडे आळशी मानले जाते. यामुळे बहुतेक मुले त्वचेची काळजी घेत नाहीत. ते त्वचेशी संबंधित समस्यांकडे दुर्लक्ष करतात.

❋ **मुरुमे**

घाणीमुळे, अनेकदा चेहऱ्यावर मुरुमे येतात. त्यावर योग्य वेळी उपचार करणे खूप महत्वाचे आहे. त्यांच्यावर योग्य उपचार केले नाहीत तर ते पसरतात आणि चेहऱ्यावर खुणा सोडतात. चेहऱ्यावर एकही मुरुम दिसला तर त्यावर त्वरित उपचार करा.

❋ **कोरडी त्वचा**

हवामान बदलले की त्वचेत काही बदल होतात. विशेषतः बहुतेक लोकांची त्वचा बदलत्या हवामानात कोरडी होते. त्वचेला भेगा पडू लागतात तेव्हा खाज सुटते.



ग्रूमिंग

नैसर्गिक तेलाच्या कमतरतेमुळे त्वचा लवकर निस्तेज दिसू लागते. म्हणून, हवामान बदलू लागताच, त्वचेवर चांगले मॉइश्चरायझर वापरण्यास सुरुवात करा. यामुळे त्वचेची आर्द्रता टिकून राहील.

❋ **टॅनिंग**

उन्हात बाहेर पडल्यामुळे त्वचा जळते किंवा काळी पडते. ही समस्या टाळायची असेल तर किमान ५० एसपीएफचा सनस्क्रीन वापरा. त्यामुळे त्वचेचा कोरडेपणा त्रासदायक ठरणार नाही.

❋ **काळी वर्तुळे**


आजकाल बाजारात डोळ्यांखालील काळ्या वर्तुळांसाठी क्रीम उपलब्ध आहे. ते त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे.

❋ **कोंडा**

डोक्याच्या त्वचेवर कोरडेपणा वाढला, की कोंड्याची समस्या उद्भवते. अशा परिस्थितीत एक तर कोंडा दूर करणारा शॅम्पू वापरा. तो उपलब्ध नसेल तर तुम्ही घरगुती उपाय वापरू शकता. कोंडा दूर करण्यासाठी दही खूप प्रभावी मानले जाते.

## नवे काही

### निरुपयोगी इमेल्स टाळायचेत?




तुम्हालाही निरुपयोगी ईमेल्सचा त्रास होतो का? स्टोरेजही भरते आणि त्यामुळे तुम्ही महत्त्वाचे ईमेल वाचू शकत नाही. जी–मेलचे हे नवीन मॅनेज सबस्क्रिप्शन फीचर तुम्हाला खूप मदत करेल. बरेचदा तुम्ही नकळत काही ब्रँड्सचे सब्स्क्रिप्शन घेता आणि ते नंतर तुम्हाला दररोज बरेच ईमेल पाठवू लागतात. हे बहुतेकदा ऑफर, न्यूजलेटर आणि प्रमोशन असलेले मेल असतात. या समस्या सोडवण्यासाठी जी–मेलने मॅनेज सबस्क्रिप्शन नावाचे एक नवीन आणि स्मार्ट फीचर लाँच केले आहे. हे फीचर तुम्हाला तुम्ही घेतलेल्या सर्व सबस्क्रिप्शनची यादी दाखवते. तुम्ही ते 'एआय'च्या मदतीने अनसबस्क्राइब करू शकता. ते संपूर्ण मेल बॉक्स स्कॅन करते आणि तुम्ही कोणत्या कंपन्यांची आणि वेबसाइट्सची सदस्यता घेतली आहे, ते ओळखते आणि तुम्हाला त्यांची यादी दाखवते. तिथून तुम्ही कोणताही मेल अनसबस्क्राइब करू शकता. तुम्ही स्पॅमला ब्लॉक करू शकता किंवा निरुपयोगी मेल म्हणून कळवू शकता. त्याच वेळी तुम्हाला आवश्यक सबस्क्रिप्शन सुरु ठेवता येते. सर्वप्रथम जी–मेल ॲप किंवा वेबसाइट उघडा. तुम्हाला वरच्या बाजूला प्रमोशन टॅब दिसेल. त्यावर क्लिक करा. तुम्हाला वरच्या बाजूला मॅनेज सबस्क्रिप्शनचा पर्याय दिसेल. आता त्यावर क्लिक करा. तुम्हाला त्या सर्व कंपन्या आणि साइट्सची यादी दिसेल. आता तुम्ही त्या एक–एक करून डिलीट करू शकता. हे फीचर ॲंड्रॉइड आणि 'आयओएस' वापरकर्त्यांसाठी उपलब्ध आहे. हे फीचर सध्या जीमेल वेबसाइट डेस्कटॉप आणि लॅपटॉपवर उपलब्ध नाही. मोबाईल वापरकर्त्यांनी त्यांचे जीमेल ॲप अपडेट करावे.

## ॲप वर्ल्ड

### 'मायक्रोसॉफ्ट'चे 'मोबाईल एआय' ॲप

'मायक्रोसॉफ्ट'च्या 'एआय मोबाईल ॲप'चे नाव 'कोपायलट' आहे. हे ॲप 'ओपन एआय'च्या चॅटजीपीटी ॲपसारखेच आहे. यापूर्वी 'मायक्रोसॉफ्ट'ने ॲंड्रॉइडसाठी त्यांचे 'एआय' ॲप कोपायलट लाँच केले होते. आता ते ॲपल वापरकर्त्यांसाठीदेखील लाँच केले आहे. आता मायक्रोसॉफ्टचे 'एआय' ॲप आयफोन आणि आयपॅड सारख्या ॲपल डिव्हाइसवरदेखील वापरता येते. कोपायलट ॲप पूर्वी बिंग चॅट म्हणून ओळखले जात होते. मायक्रोसॉफ्टने कोपायलट नावाने काही अपडेट्ससह ॲपप लाँच केले आहे. कोपायलट 'एआय ॲप' ओपनएआयच्या जनरेटिव्ह एआय चॅटजीपीटीच्या मोबाईल ॲपप्रमाणेच काम करते. कोपायलट ॲप आता ॲंड्रॉइड प्ले स्टोअरसह ॲपल ॲप स्टोअरवर उपलब्ध आहे. यासह, 'एआय'च्या क्षेत्रात स्पर्धेचे एक नवीन युग सुरू झाले आहे.




## गॅजेटच्या दुनियेत


### जाणा पाळीव प्राण्याचे लोकेशन

'यू क्लाऊडडंक' ने पाळीव प्राण्यांसाठी एक खास वेअरेबल उपकरण विकसित केले आहे. कंपनीच्या मते हा जगातील पहिला पेटफोन आहे. तो मोबाइल नेटवर्क आणि जीपीएसद्वारे पाळीव प्राण्यांच्या रिअल–टाइम स्थानाची माहिती देऊ शकतो. यामुळे पाळीव प्राणी प्रेमींना त्यांच्या पाळीव प्राण्यांचा मागोवा घेणे सोपे होईल. याशिवाय, यात 'एआय' आधारित कॉलिंग फीचरदेखील आहे. ते पाळीव प्राण्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून मालकाशी संवाद साधण्यास मदत करते. पाळीव प्राण्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी त्यात 'एआय' आरोग्य देखरेख फीचरदेखील आहे.



# टाळा या चुका

'वॉर्म अप' आणि 'कूल डाउन' ही व्यायामाची महत्त्वाची अंग आहेत. वॉर्म अपमुळे शरीर व्यायामासाठी सज्ज होतं. यामुळे दुखापती टाळता येतात. कूल डाउनमुळे हृदयाचे ठोके आणि श्वास पूर्वपदावर यायला मदत होते. पण अनेक जण फक्त मुख्य व्यायामावर भर देतात. आपल्या काही चुकांमुळे व्यायामाचे सगळे लाभ मिळत नाहीत. व्यायामादरम्यान होणाऱ्या काही चुकांविषयी...



❋ वॉर्म अपमुळे हृदयगती वाढते. स्नायूंना ऑक्सिजनयुक्त रक्ताचा पुरवठा होतो. शरीराचं तापमान वाढतं. वॉर्म अपमुळे शरीर व्यायामासाठी सज्ज होतं.

फिटनेस फंडा

❋ व्यायाम करण्याआधी ५ ते १० मिनिट वॉर्म अप करावं.

❋ प्रत्येक व्यायामप्रकाराआधी वेगळं वॉर्म अप करावं लागतं. मात्र आपण एकाच पद्धतीने वॉर्म अप करत राहतो. यामुळे व्यायामाचं तंत्र बिघडतं.

❋ व्यायामानंतर कूल डाउन केलं नाही तर स्नायूंना त्रास होऊ शकतो. कूल डाउननंतर व्यायामामुळे झालेली शरीराची झीज भरून निघते.

❋ वॉर्म अपची सुरुवात धीम्या गतीने करावी. हे व्यायाम सौम्य असावेत.

# लग्न ठरत नाही...



मी २९ वर्षांचा तरुण असून बँकेत चांगल्या पदावर नोकरी करतो. मी दिसायला चारचौघांसारखाच आहे. गेल्या वर्षभरापासून माझ्यासाठी वधूसंशोधन सुरू आहे. पालकांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. सर्वतोपरी प्रयत्न करूनही माझं लग्न ठरत नाही. आम्ही वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती दिल्या आहेत. विविध मॅट्रिमोनिअल साईट्सवरही नाव नोंदवलं आहे. कधी पत्रिका जुळत नाहीत तर कधी स्वभाव न जुळल्यामुळे बोलणी फिस्कटतात. मी एका सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबातला मुलगा आहे. आर्थिकदृष्ट्याही स्थिरस्थावर आहे. त्यामुळे आता पण लग्न करायचं आहे. पण लग्न ठरण्यात येणाऱ्या अडचणींमुळे मी खूप अस्वस्थ आहे. अनेकदा मला खूप निराश वाटतं आणि मी नियतीला दोष देत बसतो. माझ्यावर मनापासून प्रेम करणारी मुलगी कधीच मिळणार नाही, असं आता वाटू लागलं आहे. मी काय करू?

मॅच मेकिंग

**उत्तर :** सुयोग्य जोडीदार कधी मिळेल, हे कोणीच ठामपणे सांगू शकणार नाही. सद्यपरिस्थितीत तू स्वतःला वेळ दे. स्वविकास करण्याचा प्रयत्न कर. व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी असणं आणि सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबाचा भाग असणं या तुझ्या जमेच्या बाजू आहेत. सततच्या अपयशामुळे खचणं, नैराश्य येणं स्वाभाविक आहे. यातून बाहेर पडण्यासाठी समुपदेशकांची मदत घेता येईल. सोशल मीडियाच्या माध्यमातून तू समविचारी लोकांशी संवाद साध. नव्या लोकांना भेटण्यासाठी काही ग्रुप्समध्ये सहभागी हो. लग्न हे जन्मभराची कमिटमेंट आहे. गोष्टी जुळून यायला वेळ लागतो. तू धीर सोडू नकोस. मुख्य म्हणजे उतावळेपणाने कोणताही निर्णय घेऊ नकोस. तुला मनासारखा जोडीदार नक्कीच मिळेल.

# अर्ज तरी करा


सध्या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढतो आहे. त्यामुळे सातत्याने नव्या संधी, नव्या नोकऱ्या निर्माण होत आहेत. मात्र विद्यार्थी अशा नोकऱ्यांसाठी तयार नसतात. आपल्याकडे पुरेशी कौशल्यं नाहीत असं त्यांना वाटतं. या कारणामुळे ते अर्जही करत नाहीत. मात्र एखाद्या नोकरीसाठी शैक्षणिकदृष्ट्या पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज करायला हवा.



वेगळ्या वाटा

सध्या कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या पदांची निर्मिती होते आहे. आधी अशी पदं अस्तित्वात नव्हती. बदलतं तंत्रज्ञान, सोशल मीडियाचा वाढता वापर यामुळे सगळं गणित बदलून गेलं आहे. त्यातच कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही देतात. त्यामुळे घाबरून जायचं काहीच कारण नाही. सध्याच्या काळात अनेक नव्या संधी उपलब्ध होत आहेत. आपण प्रत्येक क्षेत्रातले तज्ज्ञ असू शकत नाही. मात्र प्रशिक्षण घेतल्यानंतर आपण कौशल्यं विकसित करू शकतो. त्यामुळे अशा संधी साधायला काहीच हरकत नाही. किमान अर्ज तर नक्कीच करायलाच हवा. नोकरीच्या बाजारपेठेवर नजर टाकली तर ८४ टक्के कंपन्या नव्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतात. त्यामुळे आपल्याकडे कौशल्यं नसतील तरी ती आत्मसात करता येतात. जवळपास ४२ टक्के अर्जदारांकडे नोकरीशी संबंधित कौशल्यं नसतात असं एक अहवाल सांगतो. त्यामुळे तरुणांनी नोकरीसाठी अर्ज करून किमान मुलाखत द्यावी असं तज्ज्ञ सांगतात. मुलाखतीदरम्यान तुमच्यातला एखादा गुण कंपनीला दिसू शकतो आणि तुमची निवड होऊ शकते.

# रंग बदलणारे तलाव



भारतात रंग बदलणारे तलाव पाहिले आहेत का? हवामान म्हणजेच ऋतू आणि वेळेनुसार तलावाच्या पाण्याचा रंग बदलतो, हे ऐकायला थोडे विचित्र वाटेल.

हे तलाव केवळ शास्त्रज्ञांसाठी एक गूढ आहेच, पण प्रवास प्रेमींसाठी ते एका जादुई अनुभवापेक्षा कमी नाहीत. रंग बदलणारे हे तलाव कालांतराने हिरवे, निळे, गुलाबी, जांभळे किंवा राखाडी रंगात दिसतात. हा निसर्गाचा एक चमत्कार आहे.

❋ **लोणार सरोवर**

भटकंती

महाराष्ट्रातील लोणार सरोवर बुलडाणा जिल्ह्यात आहे. २०२० मध्ये या तलावाचा रंग अचानक हिरव्यावरून गुलाबी झाला तेव्हा तो चर्चेचा विषय बनला. असे मानले जाते, की तलावात असलेल्या शैवाल आणि क्षारांमुळे पाण्याचा रंग बदलतो.

❋ **पँगॉंग त्सो तलाव**

अभिनेता आमिर खानच्या '३ इडियट्स' चित्रपटात दाखवलेल्या पँगॉंग तलावाबद्दल अनेकांना माहिती आहे. या चित्रपटामुळे हा तलाव आणखी लोकप्रिय झाला. या तलावाचा रंगही बदलतो. त्याचा रंग निळा आहे. पण तो राखाडी होतो. हा बदल सूर्यप्रकाश, ऋतू आणि उंचावर असलेल्या ढगांच्या प्रभावामुळे होतो.

❋ **सांभर सॉल्ट लेक**

राजस्थानमध्ये रंग बदलणारा एक तलाव आहे. त्याचे नाव सांभर सॉल्ट लेक आहे. हा तलाव खाऱ्या पाण्यासाठी ओळखला जातो. तथापि त्याचे पाणी खूप सुंदर दिसते. या तलावातील पाणी निळ्यापासून जांभळे आणि गुलाबीदेखील होते. पावसाळ्यात या तलावाचे पाणी रंग बदलताना दिसते. फ्लेमिंगो पक्षी या तलावात येतात आणि या तलावाचे सौंदर्य वाढवतात.

❋ **त्सोमगो (चांगू) तलाव**

सिक्कीममधील त्सोमगो तलावालाधार्मिक कथा जोडल्या गेल्या आहेत. हा तलाव हिम नदीच्या पाण्याने भरलेला असतो आणि प्रत्येक ऋतूत रंग बदलत असतो.

# सुलभ शैक्षणिक कर्ज

तुम्ही एम.टेकचे शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहत असाल पण शुल्काची चिंता तुमची पाठ सोडत नसेल, तर शैक्षणिक कर्जाचा पर्याय निवडा. आजकाल देशभरातील अनेक सरकारी आणि खासगी बँका एम.टेक सारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्जाची सुविधा देत आहेत. यामध्ये शुल्क तसेच वसतिगृह, पुस्तके, लॅपटॉप आणि राहण्याचा खर्च समाविष्ट आहे.

एम.टेक सारख्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी दहा लाख रुपयांपासून २५ लाख रुपयांपर्यंतचे शैक्षणिक कर्ज घेऊ शकतात. भारतात शिक्षण घेण्यासाठी साधारणपणे १०–१५ लाख रुपयांचे कर्ज पुरेसे असते; परंतु परदेशात शिक्षण घेण्यासाठी गरजेनुसार २५ लाख किंवा त्याहून अधिक कर्जदेखील उपलब्ध होऊ शकते. सरकारी बँकांमध्ये आयआयटी, एनआयटी, आयआयएससी यांसारख्या काही विशिष्ट संस्थांसाठी कर्जे जलद आणि कमी व्याजदराने उपलब्ध होतात.

**कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे**

❋ प्रवेश पत्र (महाविद्यालय किंवा विद्यापीठातून)

❋ अभ्यासक्रम शुल्क रचना

❋ विद्यार्थ्यांची ओळख आणि पत्ता पुरावा

❋ मागील शैक्षणिक प्रमाणपत्रे (१०वी, १२वी, पदवी)

❋ पालक किंवा हमीदाराचा उत्पन्नाचा पुरावा

❋ कर्जाची रक्कम ७.५ लाख रुपयांपेक्षा जास्त असेल तर जमीन किंवा मालमत्ता बँकेकडे गहाण ठेवावी लागू शकते.

**ईएमआयचा भार किती असेल?**

समजा तुम्ही दहा लाख रुपयांचे शैक्षणिक कर्ज घेतले आहे आणि त्याचा व्याजदर वार्षिक नऊ टक्के आहे, तर बँक तुम्हाला सहसा १ ते २ वर्षांचा मोरेटोरियम कालावधी देते. म्हणजेच तुम्हाला अभ्यासादरम्यान आणि त्यानंतर ६ ते १२ महिन्यांसाठी ईएमआय भरावा लागत नाही. यानंतर तुम्ही ७ वर्षांत कर्ज फेडले तर ईएमआय दरमहा सुमारे १४,००० ते १६,००० रुपये असू शकतो. तुम्हाला लवकर कर्ज फेडायचे असेल, तर बँका तुम्हाला प्री–पेमेंटची सुविधादेखील देतात. त्यामुळे व्याज कमी होऊ शकते.



उच्चशिक्षण

**सुलभ पेमेंटसाठी काय करावे?**

❋ अभ्यासानंतर लवकरच नोकरी मिळवण्यासाठी प्रयत्न करा. यामुळे ईएमआय सुरू होण्यापूर्वी तुमचे उत्पन्न निश्चित होईल.

❋ इंटर्नशिप, अर्धवेळ नोकरी किंवा शिष्यवृत्तीच्या मदतीने काही पैसे कमवत रहा.

❋ ईएमआय भरण्यासाठी ऑटो डेबिट किंवा ईसीएस सुविधा वापरा. असे केल्याने कोणताही हप्ता चुकणार नाही.

❋ नोकरी मिळण्यास वेळ लागत असेल तर तुम्ही बँकेला मोरेटोरियम कालावधी वाढवण्यासाठी आवाहन करू शकता.

भारत सरकारच्या क्रेडिट गॅरंटी फंड स्कीम अंतर्गत, कोणत्याही हमीशिवाय ७.५ लाख रुपयांपर्यंतचे शैक्षणिक कर्ज मिळू शकते.

# दारूचे घोट घेत शासकीय फायलींवर सह्या

## नागपूर येथील बिअर बारमधील घटना : पालकमंत्र्यांचे चौकशीचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

नागपूर शहरातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शहरातील मनीषनगर परिसरातील एका प्रसिद्ध बिअर बारमध्ये चक्क शासकीय फायलींचा गठ्ठा घेऊन तिघेजण दारू पिण्यासाठी बसले असल्याचा व्हिडिओ सध्या समाजमाध्यमांवर प्रचंड व्हायरल झाला आहे. हा प्रकार रविवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास घडल्याची माहिती असून, तिघे जण दारूचे घोट रिचवत फायलींची तपासणी करत असल्याचे व्हिडिओमध्ये स्पष्ट दिसत आहे.

या घटनेनंतर राज्य प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. दारूच्या नशेत किंवा विश्रांतीच्या वातावरणात, तेही सार्वजनिक बारमध्ये, महत्वाच्या शासकीय कागदपत्रांची पडताळणी करणे ही अत्यंत निष्काळजीपणाची बाब मानली जात आहे. फायली उघडून त्यावरील तपशील पाहणे, नोट्स घेणे आणि कदाचित सहीदेखील करणे, हे सर्व कारभार 'बार'मध्ये होत असल्याचे पाहून संतापाची लाट उसळली आहे.



माहितीनुसार, दुपारी तीनच्या सुमारास तिघेजण मनीषनगरमधील बिअरबारमध्ये आले. त्यांनी दारूची ऑर्डर दिल्यानंतर टेबलवर सरकारी कामाच्या फाईल्सचा गठ्ठा ठेवला. या फाईल्समधील कामांवरून त्यांच्यामध्ये बराचवेळ चर्चाही सुरू होती. दारू पीत असतानाच तिघांपैकी एका व्यक्तीने फाईल्सवर सह्या करायला सुरुवात केली.

सद्यःस्थितीत या तिघांपैकी कुणाचीही ओळख समोर आलेली नाही. ना त्यांचा विभाग स्पष्ट झाला आहे. तसेच त्यांनी आणलेल्या फाईल्स कोणत्या होत्या, याची माहिती समजू शकली नाही. मात्र, संबंधित बारमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असल्याने फुटेजच्या आधारे त्यांची ओळख पटविणे सहज शक्य आहे. अद्याप या प्रकरणी कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही.

**सरकार, साहेबांचे आनंदी-आनंद**

सरकार एवढे भ्रष्ट झालेले आहे की खालपर्यंत हा भ्रष्टाचार रुजलेला आहे. साधा सरकारी बाबू सुद्धा आता गरिबांना लुटल्याशिवाय फाईल पुढे सरकवू शकत नाहीत. महाराष्ट्रात अशी परिस्थिती कधीच पाहिली नाही. कुणावरच धाक राहिला नाही. केवळ मंत्रालयातच भ्रष्टाचार आहे असे नव्हे. मंत्रालयात तर आता मोठा अड्डा झाला आहे. पैसा आणि नशा एवढंच काम आता काही सरकारी बाबूंना उरलंय का? ना जबाबदारी, ना भीती वरून दारूचा घोट, टेबलाखालून पैशाची नोट ? सरकारचा कुणालाच धाक उरलेला नाही, जनतेचे सरकारला काही पडले नाही. सरकार आणि अधिकारी यांचं मात्र सगळं आनंदी-आनंद चाललंय.

**विजय वडेट्टीवार**



पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या घटनेची गंभीरपणे दखल घेतली असून या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहे. वर्धा येथे भाजपच्या बैठकीसाठी बावनकुळे गेले असता तेथे पत्रकारांनी नागपूरच्या घटनेकडे लक्ष वेधले असता ते म्हणाले, विभागीय आयुक्तांशी मी याबाबत बोललेलो आहे, सायबर शाखेसोबतही चर्चा केली आहे आणि त्याना यासंदर्भातील अहवाल सादर करण्यास सांगितला आहे. येत्या तीन दिवसात या प्रकरणात कारवाई झाल्याचे दिसेल.पालकमंत्री म्हणून मी या घटनेचे पूर्ण विश्लेषण करणार आहे कोणत्या विभागाची फाईल हे याची चौकशी सुरू झाली आहे.

## प्रतिभावंत साहित्यिक, ज्येष्ठ कादंबरीकार
# शुभांगी भडभडे यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :



ज्येष्ठ कादंबरीकार शुभांगी भडभडे यांचे नागपूरमध्ये निधन झाले. त्या ८३ वर्षांच्या होत्या.

शुभांगी भडभडे यांचा जन्म २१ डिसेंबर १९४२ रोजी झाला होता. त्यांनी चरित्रात्मक कादंबऱ्या, सामाजिक कादंबऱ्या, कथासंग्रह, नाटक, एकांकिका, प्रवासवर्णन, ललित लेखसंग्रह, बालसाहित्य असे विपुल लेखन केले. वयाची ८० पूर्ण झाल्यानंतरही त्यांचे लेखन सुरू होते.

शुभांगी भडभडे या साहित्य क्षेत्रातील उत्तम संघटकही होत्या. वैदर्भीय लेखकांना व्यासपीठ देण्यासाठी त्यांनी पद्मगंधा प्रतिष्ठानची स्थापना केली. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक उपक्रम यशस्वी केले. त्यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शोक व्यक्त केलाय.

शुभांगी भडभडे यांनी तब्बल २२ सामाजिक आणि २३ चरित्रात्मक कादंबऱ्यांचे लेखन केले. त्यांच्या १८ कादंबऱ्या हिंदीत प्रकाशित झाल्यात. त्यांची आठ महानाटकेही हिंदी प्रकाशित झाली. त्यांच्या कादंबऱ्या आणि कथा, नाटके मराठीसोबतच हिंदीमध्ये प्रसिद्ध झाले.

त्यांना अनेक मानाचे पुरस्कार मिळाले. विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार, सारथी साहित्य अवार्ड, महाराष्ट्र सरकारचा उत्कृष्ट वाङ:मय पुरस्कार, साहित्य अकादमी बडोदेचा कथा पुरस्कार, सुमन देशपांडे बाल साहित्य पुरस्कार, पंजाब सरकारचा पुरस्कार, कोलकात्याचा प्रज्ञा पुरस्कारासह अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव झाला. त्यांची नाटके अंदमान ते लेह लडाख, दार्जिलिंग ते द्वारका , हिमाचल ते गोवा, दुबई आणि अमेरिकेत झाली. राष्टीय चरित्र कादंबरीकार उपाधीनेही त्यांचा गौरव झालाय.

**चरित्रलेखनात मोठे योगदान**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी शुभांगी भडभडे यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले. ते आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, 'सुप्रसिद्ध लेखिका, ज्येष्ठ कादंबरीकार आणि पद्मगंधा प्रतिष्ठानच्या माध्यमातून नवोदित लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या साहित्यसाधक शुभांगीताई भडभडे यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांनी चरित्रलेखनाच्या क्षेत्रात मोठे योगदान दिले.

स्वातंत्र्यवीर सावरकर, आद्य सरसंघचालक प.पू. डॉ. हेडगेवारजी, प. पू. गोळवलकर गुरुजी, मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्यावरही त्यांनी चरित्रलेखन केले होते. त्यांच्या निधनाने एक प्रतिभावंत साहित्यिक आपण गमावला आहे आणि साहित्य क्षेत्राने एक ज्येष्ठ मार्गदर्शक! 'मृत्युंजयाचा महायज्ञ' ही कादंबरी त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर लिहिली, तेव्हा त्याला 'ऑडियो बुक'मध्ये रूपांतरित करण्याची विनंती मी त्यांना केली होती आणि त्यांनी त्याला सहर्ष होकार दिला आणि ते काम पूर्ण झाले. अनेक पुस्तकांना त्यांनी हक्काने माझ्याकडून प्रस्तावना घेतल्या. त्यामुळे सातत्याने त्यांच्याशी संवाद व्हायचा. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शुभांगी भडभडे यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले. ते आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, 'ज्येष्ठ कादंबरीकार शुभांगी भडभडे यांनी साहित्य क्षेत्रात दिलेले योगदान कधीही विसरता येणार नाही. त्यांनी साहित्याचा एक अमूल्य ठेवा आपल्या वाचकांसाठी मागे ठेवला आहे. पद्मगंधा प्रतिष्ठानच्या माध्यमातून लेखिका नाट्य महोत्सवासारख्या अनोख्या उपक्रमाचे त्यांनी सातत्याने आयोजन केले. केवळ नागपूर नव्हे, तर संपूर्ण विदर्भातील लेखिकांना एका धाग्यात बांधून नवलेखिकांना प्रोत्साहन देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या निधनाने साहित्य क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. शुभांगीताईंना भावपूर्ण श्रद्धांजली.

मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही शुभांगी भडभडे यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. 'सुप्रसिद्ध लेखिका, ज्येष्ठ कादंबरीकार आणि नवोदित साहित्यिकांच्या सृजनात्मक उभारणीस कटिबद्ध राहिलेल्या पद्मगंधा साहित्य प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा शुभांगीताई यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद असल्याचे पाटील म्हणाले.

## त्या युवक-युवतींना पोलीस पदाचे नियुक्तीपत्र

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २८ :

गडचिरोलीत नक्षल्यांनी क्रूरपणे हत्या केलेल्या पीडित नागरिकांच्या मुला-मुलींना मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस शिपाई पदावर थेट नियुक्तिपत्र प्रदान करण्यात आले.

नक्षलवाद्यांच्या क्रूरतेला बळी पडलेल्या सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि पुनर्वसनासाठी कुठल्याही प्रकारच्या सुविधा, सवलती उपलब्ध नव्हत्या. याचा सारासार विचार करून २०१८ च्या शासन निर्णयान्वये नक्षलपीडित कुटुंबीयांना शासनाच्या विविध विभागांमध्ये गट-क व गट-डच्या पदांवर थेट नियुक्ती देण्याची तरतूद केली. यानुसार २०२५ मध्ये एकूण २३ नक्षलपीडित तरुणांना पोलिस शिपाई पदावर थेट नियुक्ती देण्यात आली आहे.

२३ पैकी दोन नक्षलपीडित कुटुंबांतील तरुणांना फडणवीस यांच्या गडचिरोली दौऱ्यात नियुक्तिपत्र प्रदान करण्यात आले. मागील ३ वर्षात एकूण ५६ नक्षलपीडित तरुणांना गडचिरोली पोलिस दलात पोलिस शिपाई पदावर थेट नियुक्ती देण्यात आलेली असून उर्वरित नक्षलपीडित कुटुंबातील युवक-युवतींनाही लवकरात लवकर नियुक्ती देण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

गडचिरोली जिल्ह्यातील सुशिक्षित युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने गडचिरोली जिल्हा पोलिस दलाच्या पोलिस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून प्रोजेक्ट उडानअंतर्गत पोलिस अधीक्षक कार्यालय गडचिरोली येथे कौशल्य विकास केंद्राची (स्किलिंग इन्स्टिट्यूट) सुरुवात करण्यात आली होती. यात प्रशिक्षण घेतलेल्या १०५० प्रशिक्षणार्थींना कौशल्य विकास प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

## भंडारा जिल्हा बँक निवडणूक सहकार पॅनलचा दणदणीत विजय

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. २८ :

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक भंडाराच्या निवडणुकीत २१ पैकी १५ जागांचा निकाल लागला असून महायुती प्रणित सहकार पॅनलच्या उमेदवारांचा दणदणीत विजय झाला आहे. निकाल लागलेल्या १५जागांपैकी ११ जागांवर सहकार पॅनलचे उमेदवार निवडून आले असून काँग्रेस प्रणीत परिवर्तन पॅनलचे चार उमेदवार विजयी झाले आहेत.



नाना पटोलेंसह खा. प्रशांत पडोळे यांना दणका

२१ पैकी सहा जागांचा निकाल न्यायालयीन प्रक्रियेमुळे थांबला असून मंगळवार, २९ जुलै रोजी न्यायालय काय निर्णय देते त्यानंतर त्याचा निकाल समोर येईल. मात्र महायुतीच्या सहकार पॅनलने ११जागांवर विजय मिळवल्याने पुन्हा एकदा बँकेचे विद्यमान अध्यक्ष सुनील फुंडे यांच्या ताब्यात बँकेची सूत्रे आली आहेत हे निश्चित झाले आहे.

या निवडणुकीत राष्ट्रवादीचे खा. प्रफुल्ल पटेल यांच्या मार्गदर्शनात सुनील फुंडे यांच्या नेतृत्वात सहकार पॅनलने काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले व विद्यमान खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांना दणका देत सहकारात फुंडेच दादा असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

मागील वीस वर्षांपासून या बँकेवर सुनील फुंडे यांचे वर्चस्व राहिले आहे. काँग्रेसने यावेळी मोठी शक्ती पणाला लावली होती. मात्र, मतदारांनी काँग्रेसला नाकारले. काँग्रेसमधील आमदार व खासदार यांच्यातील अंतर्गत मतभेदांमुळे व समन्वयाच्या अभावामुळे परिवर्तन पॅनलला पराभवाला सामोरे जावे लागले असल्याचे त्यांच्याच गोटातून बोलले जात आहे.

या निवडणुकीत काँग्रेसने माजी प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले व विद्यमान खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांच्या नेतृत्वात जोर लावला. मात्र त्यांच्या पदरी निराशा पडली आहे. दुध संघ गटातून बँकेचे विद्यमान अध्यक्ष सुनील फुंडे (९३) यांनी काँग्रेसचे विद्यमान खा. प्रशांत पडोळे (४९) यांचा ४४मतांनी दणदणीत पराभव केला.

मजूर संघ गटात मजूर संघाचे विद्यमान अध्यक्ष भ. सु, खंडाईत (४५) यांचा सहकार पॅनलचे कैलाश नशीने (६१) यांनी १६ मतांनी पराभव करत काही वर्षांपूर्वी झालेल्या मजूर संघातील पराभवाचा वचपा काढला आहे.

मतदारांनी आम्हाला कौल दिलेला आहे. जिल्हा बँकेने गेल्या तीन दशकांपासून चांगल्या प्रकारे काम केले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कामाचा विस्तार करणार असल्याचे सुनील फुंडे म्हणाले. भंडारा जिल्हा बँकेचा लौकिक राज्यात आणि देशात आहे. जिल्हा बँकेची यशस्वी परंपरा पुढील काळात जपणार असल्याचे सुनील फुंडे म्हणाले.

## : हॅलो डॉक्टर :
# अन्नाची ॲलर्जी
## कारण, लक्षणं आणि उपचार

लोकारोग्य




व्यक्ती तितक्या प्रकृती हा निसगार्चा अगदी साधा नियम आहे. प्रत्येक व्यक्तीच्या शरीर रचनेप्रमाणे त्याची प्रतिकारशक्ती हि भिन्न भिन्न असू शकते. अर्थात त्यामुळेच प्रत्येकाची आजाराची कारण देखील वेगवेगळी असू शकतात. अनेकांना खाद्यपदार्थ म्हणजे विशिष्ट प्रकारच्या पालेभाजा, शेंगभाजा, फळभाज्या किंवा मांस, मटण, दुधाचे पदार्थ, आंबट पदार्थ अशा कोणत्याही प्रकारच्या पदाथार्ची ॲलर्जी असू शकते.

अशा व्यक्तींनी तो विशिष्ट पदार्थ सेवन करताच त्याच्या शरीरांतर्गत आणि शरीराबाहेर लगेच काही दुष्परिणाम जाणवू लागतात. म्हणूनच अशा व्यक्तींना अलर्जी युक्त पदार्थ हे वर्ज्य मानले जातात. परंतु, मुळातच अशा प्रकारची एखाद्या पदार्थाची ॲलर्जी असणे म्हणजे नेमका काय आजार किंवा व्याधी आहे? ॲलर्जीची सर्वसाधारण लक्षण काय असतात?आणि या आजारावर नेमका इलाज काय आहे? या संदर्भात त्वचाविकार तज्ज्ञ डॉ. मृणालिनी डोके यांच्याशी बातचीत.

**अन्नाची ॲलर्जी म्हणजे नेमका काय प्रकार आहे?**

○ अन्नाची अनेकांना ॲलर्जी असते. काही विशिष्ट पदार्थांची ॲलर्जी असते. अन्नाची ॲलर्जी हि रोगप्रतिकारक शक्तीची एक प्रतिक्रिया आहे जी विशिष्ट अन्न खाल्ल्यानंतर लगेचच होते. या व्याधीची शरीरावर लक्षण दिसतात. काही लोकांमध्ये ॲनाफिलेक्सिस म्हणून ओळखली जाणारी हि ॲलर्जी जीवघेणी देखील ठरू शकते. अन्नाची ॲलर्जी ५ वर्षाखालील अंदाजे ८ टक्के मुलांना आणि प्रौढांपैकी ४ टक्के लोकांना असते.

**अन्नाची ॲलर्जी असण्यामागे कारण काय आहेत?**

○ एखाद्याला विशिष्ट अन्न पदाथार्ची ॲलर्जी असते म्हणजे त्यांची रोगप्रतिकारक शक्ती त्या विशिष्ट अन्नाला प्रतिसाद देत नाही. ती हानिकारक असते. रोगप्रतिकारक शक्ती पेशींना इमिनोग्लोबुलीन इ नावाचे ॲंटीबॉडी तयार करण्यास प्रेरित करते. जे ॲलर्जी निर्माण करणारे अन्न किंवा अन्न पदार्थ, ज्याला ॲलर्जीन म्हणून ओळखले जाते. बहुतेक अन्न ॲलर्जी हि कोलंबी, खेकडा, शेंगदाणे, अक्रोड, मासे, अंडी, गहू, सोया अशा प्रथिनयुक्त पदार्थामुळे होते. काही लोकांना परागकण अर्थात अन्न ॲलर्जी सिंड्रोम म्हणतात ती ॲलर्जी असते. काही फळभाजा, फळ, काजू, मसाले यामुळे हि ॲलर्जी होते. काहींना व्यायामामुळे, अन्न पचविण्यासाठी असलेल्या एंझाइम ची कमतरता,अन्नातून विषबाधा ग्लूटेन ॲलर्जी अशा अनेक कारणामुळे ॲलर्जी उदभवू शकते.

**विशिष्ट अन्न पदाथार्मुळे ॲलर्जी उद्भवली आहे याची लक्षण काय असतात?**

○ काही लोकांमध्ये विशिष्ट अन्न खाल्ल्यानंतर तासाभरातच लक्षण जाणवू लागतात तर काहींमध्ये हि ॲलर्जी जीवघेणी असू शकते. सामान्यपणे तोंडात मुंग्या येणे, अंगाला खाज सुटणे, अंगावर पित्ताच्या गाठी उमटणे, ओठ,चेहरा, जीभ किंवा घसा या भागावर सूज येणे. पोटदुखी, अतिसार, मळमळ, चक्कर येणे, डोके हलके होणे, श्वास घेण्यास त्रास किंवा अगदी बेशुद्ध पडणे अशी लक्षण जाणवतात.

**ॲलर्जी या व्याधीवर उपचार नेमके काय आहेत?**

○ अन्नाच्या ॲलर्जीवर ठोस असे वैद्यकीय उपचार उपलब्ध नसले तरी ज्या पदार्थापासून आपल्याला ॲलर्जी आहे अशा पदाथार्पासून दूर राहणे हा सर्वोत्तम उपाय आहे. मात्र असेही काही उपचार उपलब्ध आहेत जे तुमचा ॲलर्जीचा धोका कमी करू शकतात. यामध्ये काही इंजेक्शन आणि सबलिंग्युएल इम्युनोथेरॅपी यांचा समावेश आहे. विशिष्ट पदाथार्ची ॲलर्जी असलेल्या व्यक्तीला ओमालीझूमब नावाचे इंजेक्शन महिन्यातून एकदा देतात. शिवाय तोंडावाटे इम्युनोथेरपी देऊन ॲलर्जीयुक्त पदार्थांचे सेवन करता येते. या शिवाय एपिनेफ्रिम, कार्टिकोस्टिरॉईड, ॲंटिहिस्टामाइन्स अशा औषधांचा देखील ॲलर्जी कमी करण्यासाठी उपचार म्हणून वापर करतात.

■ ■ ■



### नवजात शिशुंसाठी अंकुर हॉस्पिटलचा दुध बँक उपक्रम

अंकुरा महिला आणि मुलांसाठी रुग्णालयाने त्यांच्या एलबी नगर शाखेत 'अंकुरा-धात्री दूध बँके'चे उद्घाटन करून नवजात शिशु काळजी वाढवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या उपक्रमाचे उद्घाटन नवजात शिशुशास्त्राचे प्रमुख प्रो. प्रवीण कुमार यांनी केले. डॉ. श्रीशैलम कोथुरु,डॉ. श्रीनिधी थिरुनागरी (संचालक, अंकुरा हॉस्पिटल), डॉ. विजय कुमार (अधीक्षक, निलौफर हॉस्पिटल), डॉ. संतोष कुमार क्रालेती (सरचिटणीस, सुशेना हेल्थ फाउंडेशन) यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या अग्रगण्य सुविधेचा उद्देश निरोगी दात्या मातांकडून अकाली जन्मलेल्या आणि गंभीर आजारी नवजात बालकांना सुरक्षित, तपासणी केलेले आणि पाश्चराइज्ड आईचे दूध प्रदान करणे आहे, ज्यामुळे त्यांना जगण्याची आणि निरोगी विकासाची अधिक चांगली संधी मिळते.

आईचे दूध हे बाळांसाठी निसगार्चे परिपूर्ण अन्न मानले जाते, ज्यामध्ये ॲंटीबॉडीज, एंजाइम आणि पांढऱ्या रक्त पेशींचे एक अद्वितीय मिश्रण असते जे संक्रमणांपासून संरक्षण करते आणि एकूण वाढीस समर्थन देते. हे लठ्ठपणा, मधुमेह आणि काही कर्करोगांसारख्या दीर्घकालीन आरोग्य स्थितींचा धोका कमी करते हे सिद्ध झाले आहे.

त्याच्या पौष्टिक मूल्याव्यतिरिक्त, स्तनपान आई आणि बाळामधील बंध मजबूत करते आणि विशिष्ट कर्करोग, मधुमेहाचा धोका कमी करून आणि बाळंतपणानंतर पुनर्प्राप्ती करण्यास मदत करून मातांना फायदा करते. नाजूक आणि अकाली जन्मलेल्या बाळांसाठी, आईच्या दुधाची उपलब्धता बहुतेकदा जीवनरक्षक असते, नेक्रोटायझिंग एन्टरोकॉलायटिस सारख्या आजारांना प्रतिबंधित करण्यास मदत करते, जी अकाली जन्मलेल्या बाळांमध्ये सामान्य आहे.

■ ■ ■

### आरोग्यवर्धक चिंच

चिंच हे एक आंबट-गोड फळ आहे ज्याचा उपयोग अनेक भारतीय आणि आफ्रिकन पाककृतींमध्ये केला जातो. चिंच हे असेच एक फळ आहे जे अनेक गुणांनी परिपूर्ण आहे. शरीरात तीव्र दाह यकृत खराब करू शकते. एका संशोधनानुसार, संधिवात असलेल्या उंदरांना चिंचेच्या बियांचा रस दिला गेला. ज्यामुळे त्यांच्या यकृतातील ऑक्सिडेटिव्ह ताण कमी झाला. चिंचेच्या रसामध्ये असलेले सक्रिय प्रोसायनिडिन यकृताचे नुकसान कमी करण्यास मदत करते. चिंचेचा रस ग्लूटाथिओन, टोटल थिओल्स, ग्लूटाथिओन पेरोक्सिडेस आणि रिडक्टेस सारख्या दाहक मार्करची पातळी कमी करते. यामध्ये असलेले अल्फा-हायड्रॉक्सिल ॲसिड त्वचेला गुळगुळीत आणि मुलायम बनवते. चिंचेचा लगदा रक्ताच्या प्लाज्मामध्ये असलेले खराब कोलेस्ट्रॉल कमी करते आणि चांगले कोलेस्ट्रॉल वाढवते. चिंचेच्या रसाने फॅटी ॲसिड सिंथेस नावाच्या एन्झाइमची क्रिया कमी करण्यासाठी फायदे दर्शविले आहेत. ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## काँग्रेसचे गोरंट्याल-वरपूडकर भाजपमध्ये : काँग्रेसला जबर धक्का!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :

मराठवाड्याच्या राजकारणात एक मोठी भूकंपजन्य घडामोड समोर आली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी आमदार आणि जनतेत लोकप्रिय असलेले कैलास गोरंट्याल (जालना) आणि सुरेश वरपूडकर (परभणी) हे भाजपमध्ये प्रवेश करत आहेत, अशी माहिती समोर आली आहे.

मंगळवार २९ जुलै रोजी दुपारी ३ वाजता मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात हे दोन्ही दिग्गज नेते भाजपमध्ये प्रवेश करणार असून, यावेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा मोठा राजकीय सोहळा पार पडणार आहे.

काँग्रेससाठी ही एक मोठी नामुष्कीची वेळ असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर हा धक्का पक्षाच्या मुळांपर्यंत जाऊन बसला आहे. गोरंट्याल हे तीन वेळा आमदार राहिले असून जालना जिल्ह्यात त्यांचा मोठा जनसंपर्क आहे.

वरपूडकर हे परभणी जिल्ह्यात काँग्रेसचा मजबूत चेहरा होते आणि विविध पदांवर काम केलेले नेते आहेत. त्यामुळे या दोघांच्या भाजपप्रवेशामुळे काँग्रेसची मराठवाड्यातील मक्तेदारी डळमळीत झाल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये सध्या काँग्रेसमुक्तीचा धडाका सुरु असून, एकामागून एक दिग्गज नेते भाजपच्या वाटेवर आहेत.

काँग्रेसमध्ये गटबाजी, नेतृत्वाचा अभाव आणि कार्यकर्त्यांशी संवादाचा तुटलेला धागा यामुळे अनेकजण भाजपकडे ओढले जात आहेत. भाजपने हेच भान राखत रणनीती आखली असून, मराठवाड्याला भाजपचा मजबूत किल्ला करण्याचा निर्धार केला आहे.

## कारने दुचाकीला उडवले
# भीषण अपघातात पती-पत्नी ठार

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. २८ :



नागपंचमी निमित्त हंगामी व्यवसायाच्या दृष्टीने चंद्रपूर येथून लाह्या, वटाणे, फुटाणे व इतर पूजेचे साहित्य खरेदी करून मोटर सायकलने आपल्या स्वगावी भद्रावती तालुक्यातील मुरसा येथे परत येत असताना मागेहून येणाऱ्या एका कारने दिलेल्या जोरदार धडकेत पती व पत्नी गंभीर जखमी झाले.

नंतर उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. ही घटना चंद्रपूर-नागपूर महामार्गावरील साखरवाही फाट्या जवळील ताडाळीच्या सीडीसीसी बँकेजवळ घडली. भद्रावती तालुक्यातील मूर्सा निवासी सुभाष पुंडलिक कामतवार (४५) तर गिरजा सुभाष कामतवार (४२) असे मृत दांपत्याचे नाव आहे.

नेहमीच ग्रामीण भागात हंगामी व्यवसाय करणारे हे दाम्पत्य नेहमीप्रमाणे नागपंचमीच्या पर्वावर व्यवसाय करण्यासाठी लाह्या, नारळ, वाटाने,फुटाणे व पूजेचे साहित्य खरेदी करण्यासाठी चंद्रपूर येथे गेले होते.ठोक विक्रेत्याकडून विक्रीचे साहित्य खरेदी करून आपल्या मोटर सायकल ने आपले मूळ गाव मूरसा कडे जात असताना नागपूर महामार्गावरील ताडाळीच्या चंद्रपूर मध्यवर्ती बँकेच्या समोर मागून येणाऱ्या कारने (एमएच १५ जेडी १०९६) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

यात सुभाष व त्यांची पत्नी गिरजा हे गंभीर जखमी झाले. उपचारासाठी त्यांना चंद्रपूरच्या कोल सिटी या खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नागपूरला रवाना केले.

या दरम्यान त्यांना वरोरा येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले तिथे त्यांना मृत घोषित केले. त्यांचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी चंद्रपूर येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले. पुढील तपास पोलीस करीत आहे. मृत दाम्पत्य भोई समाजाचे असून त्यांच्या पश्चात २ मुले,१ मुलगी व बराच मोठा आप्त परिवार आहे.

## चव्हाण यांनी घेतली पीएम मोदींची भेट

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सोमवारी नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली.

या भेटीत महाराष्ट्र भाजपची संघटनात्मक घडामोडी, आगामी कार्यक्रमांचे नियोजन व पक्षवाढीची दिशा याबाबत सविस्तर माहिती चव्हाण यांनी मोदी यांना दिली.

पंतप्रधान मोदींसोबतच्या भेटीत त्यांनी कार्यकारी अध्यक्ष म्हणून केलेल्या कामाचा अहवाल त्यांना सादर केला. महाराष्ट्रात बूथ पातळीवर सुरू असलेले संघटनकार्य, सदस्य नोंदणी मोहिम, पदाधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, संपर्क अभियान आणि महिला-युवा आघाड्यांच्या उपक्रमांचा सविस्तर आढावा आहे. पुढील वाटचालीस मोदी यांनी चव्हाण यांना शुभेच्छाही दिल्या.

## सीएम फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांचा सन्मान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, सदर क्षेत्र सुरेंद्रगड मंडळाच्या अधिकाऱ्यांनी १० वी आणि १२ वी इयत्तेतील ४०% ते ९८% गुणांसह उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार केला.



याप्रसंगी सुनील अग्रवाल, प्रगतीताई पाटील, माजी नगरसेवक निशांत गांधी, बोरगाव मंडळाचे माजी अध्यक्ष विनोद कान्हेरे, धनराज तेलंग, मनिष महाल्ले, गोविंद अग्रवाल, डॉ.सुधीर पारेख, बाबू दादुरिया, कमल नामपल्लीवार, अरूणजैन, कोठारी, पूजा बेतलवार, अनुपम शायरी, माधुरी फुरसुंगे, ललित फुलसंगे, रवी पेंदाम, नीता जिजोतिया, विनोद बघेल, धनंजय मेंढे, अनिल गजलवार, बिहारी शिवहरे, धारिवाल, प्रवीण पेडलवार, सुरेश हारोडे, संजय हरोडे, संजय हारोडे, दिनेश पशिने आणि भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यास परिसरातील कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.